सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॉमनवेल्थ, ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने दोन वेळा सन्मानित
मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे 'स्वच्छ कॅम्पस रँकिंग २०१९ मानांकन प्राप्त

ज्ञानगंगा घरोघरी

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(नॅक मानांकित 'अ' श्रेणी)

www.ycmou.ac.in

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा

ग्रंथालय व माहितीशास्त्र निष्णात शिक्षणक्रम (P16)

माहितीपुस्तिका

शैक्षणिक वर्ष — २०२५-२६



विद्यापीठ गीत

एक प्रतिज्ञा असे आमुची ज्ञानाची साधना ।
चिरंतन ज्ञानाची साधना ।
ज्ञान हेच संजीवन साऱ्या जगताच्या जीवना ॥ धृ ॥

ज्योत जागवू सुजाणतेची सकलांच्या अंतरी ।
तीच निवारील पटल तमाचे प्रभात सूर्यापरी ।
ज्ञानच देउळ, ज्ञानच दैवत, प्रगतीच्या पूजना ।। १ ।।

नव्या युगाचा नव्या जगाचा ज्ञान धर्म आहे ।
त्यातच अमुच्या उजळ उद्याचे आश्वासन राहे ।
मुक्त करिल तो परंपरेच्या बंदिघरातुन मना ॥ २ ॥

हाच मंत्र नेईल आम्हाला दिव्य भविष्याकडे ।
न्यायनीतीचे पाऊल जिथे भेदाशी ना अडे ।
जे जे मंगल पावन त्याची जेथे आराधना ।। ३ ।।

कुसुमाग्रज

निर्मिती
प्रा. नागार्जुन वाडेकर
संचालक, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक -४२२२२२

© २०२५ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
- प्रकाशन : जून, २०२५
- अक्षरजुळणी : रुपाली गायकवाड, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
- प्रकाशक : दिलीप भरड, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक—४२२ २२२

ग्रंथालय व माहितीशास्त्र निष्णात शिक्षणक्रम (P16) माहितीपुस्तिका
शैक्षणिक वर्ष - २०२५-२६

अनुक्रमणिका

०१. मुक्त विद्यापीठाचा परिचय
- १.१ मुक्त विद्यापीठाची उद्दिष्टे

०२. विद्याशाखेचा परिचय
- २.१ विद्याशाखेची उद्दिष्टे
- २.२ विद्याशाखेची ठळक वैशिट्ये

०३. शिक्षणक्रमाविषयी
- ३.१ शिक्षणक्रमाची उद्दिष्टे आणि निष्पत्ती
- ३.२ प्रवेश पात्रता
- ३.३ शिक्षणक्रम शुल्क
- ३.४ कालावधी
- ३.५ माध्यम
- ३.६ श्रेयांक
- ३.७ शिक्षणक्रमाची संरचना
- ३.८ अध्ययन साहित्य
- ३.९ अध्ययन पद्धती

०४. मूल्यमापन पद्धती
- ४.१ अंतर्गत मूल्यमापन
- ४.२ अंतिम मूल्यमापन

०५. नोंदणी प्रक्रिया

०६. शिष्यवृत्ती योजना लागू असलेले विद्यापीठाचे शिक्षणक्रम

०७. ABC-ID/ APAAR-ID आणि DEB-ID तयार करण्याविषयीची सूचना

०८. विशेष सूचना / संपर्कासाठी

०९. सायबर सुरक्षा अभ्यासक्रम (अनिवार्य ऑडीट कोर्स)

१०. विभागीय केंद्रे

११. परिशिष्टे
- परिशिष्ट ०१ : उमेदवार/विद्यार्थी करारनामा (इंग्रजी आणि मराठी)
- परिशिष्ट ०२ : गरीब विद्यार्थी सहाय्य योजना नियमावली
- परिशिष्ट ०३ : विद्यापीठ अनुदान आयोगाचे (युजीसीचे) मान्यता पत्र (२००४)
- परिशिष्ट ०४ : मुक्त विद्यापीठाच्या पदव्या व पदविकांना समकक्षता व शासनमान्यता या संदर्भातील महाराष्ट्र शासनाचा शासन निर्णय
- परिशिष्ट ०५ : पूर्वतयारीनंतर पदवी प्राप्त केल्यास १० वी / १२ वी समकक्षतेबाबतचा शासन निर्णय
- परिशिष्ट ०६ : एकापेक्षा अधिक शिक्षणक्रमांना प्रवेश घेता येण्याबाबतचे दूरशिक्षण मंडळाचे ज्ञापन
- परिशिष्ट ०७ : विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी) मान्यता पत्र
- परिशिष्ट ०८ : विद्यार्थी सहायता आणि विद्यार्थी कल्याण योजना
- परिशिष्ट ०९ : सायबर सुरक्षा अभ्यासक्रम(अनिवार्य ऑडीटकोर्स) संबंधी माहिती
- परिशिष्ट १० : सायबर सुरक्षा अभ्यासक्रमासंबंधी विद्यापीठ अनुदान आयोगाचे पत्र
- परिशिष्ट ११ : IBM Certificate Program in Emerging Technologies
- परिशिष्ट १२ : अंतिम परीक्षा : प्रश्नपत्रिका स्वरूप
- परिशिष्ट १३ : शिक्षणक्रमाचे वेळापत्रक

०१. मुक्त विद्यापीठाचा परिचय

'मुक्त विद्यापीठ' ही संकल्पना नवी असून जगभरात तिचा सर्वत्र स्वीकार झाला आहे. विविध कारणांमुळे अनेकांना शिक्षण अर्धवट सोडावे लागते. ग्रामीण भागांना शैक्षणिक सुविधांचा अभाव असल्यामुळे, तसेच नोकरी - व्यवसायामुळे पुढील शिक्षण घेण्याची इच्छा असूनही ज्यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागते, त्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याच्या ध्येयाने मुक्त विद्यापीठे कार्यरत झाली आहेत. सन १९६९ मध्ये जगातील पहिले मुक्त विद्यापीठ इंग्लंडमध्ये स्थापन झाले. त्या पाठोपाठ चीन, जपान, कॅनडा, थायलंड, श्रीलंका, पाकिस्तान, बांगलादेश अशा अनेक देशांमध्ये मुक्त विद्यापीठे स्थापन झाली असून याद्वारे विविध शिक्षणक्रमांच्या संधी समाजातील इच्छुकांना दिल्या जात आहेत. भारतात १९८२ मध्ये हैद्राबाद (आंध्रप्रदेश) येथे पहिले मुक्त विद्यापीठ स्थापन झाले. सन १९८५ मध्ये केंद्र सरकारने राष्ट्रीय पातळीवर 'इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ' दिल्ली येथे स्थापन केले. त्यानंतर राजस्थान, बिहार, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात, कर्नाटक, पश्चिम बंगाल, उत्तरप्रदेश, तामिळनाडू, छत्तीसगढ, आसाम, उत्तराखंड, ओरिसा, पंजाब, केरळ या राज्यांत मुक्त विद्यापीठे कार्यरत झाली आहेत.

महाराष्ट्राला सामाजिक, शैक्षणिक परिवर्तन घडवणाऱ्या विचारवंतांची परंपरा लाभलेली आहे. महात्मा जोतिबा फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील, स्वामी रामानंद तीर्थ यांनी शिक्षणासाठी अमूल्य योगदान दिले आहे. त्यांचा वारसा घेऊन खेड्यापाड्यापर्यंत उच्च शिक्षण पोहोचवण्याच्या उद्देशाने महाराष्ट्रातल्या इतर विद्यापीठांप्रमाणेच दि. १ जुलै १९८९ रोजी महाराष्ट्र शासन विधिमंडळाच्या क्रमांक XX (१९८९) अन्वये मुक्त विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. आधुनिक महाराष्ट्राचे जनक यशवंतराव चव्हाण यांचे नाव या विद्यापीठास देण्यात आले आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ हे भारतातले पाचवे आणि महाराष्ट्रातले पहिले मुक्त विद्यापीठ आहे. विद्यापीठाचे मुख्यालय नाशिक येथे असून संपूर्ण महाराष्ट्र राज्य हे या विद्यापीठाचे कार्यक्षेत्र आहे. विद्यापीठाच्या 8 विभागीय केंद्रांच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रभरातील २४०० पेक्षा अधिक अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहायता केंद्र जोडलेली आहेत.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) कायदा कलम १२ (ब) अन्वये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाला मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य विधीमंडळ आणि विद्यापीठ अनुदान आयोग यांनी विद्यापीठास प्रमाणपत्र, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी तसेच संशोधन शिक्षणक्रम राबविण्यास अनुमती दिलेली आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अनेक नामांकित राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय शैक्षणिक संस्थांचे सदस्य आहे. विद्यापीठाला सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने दोनवेळा सन्मानित करण्यात आले आहे. तसेच नुकतीच नॅक मानांकित **'A'** श्रेणी प्राप्त झाली आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ देशातील सर्व मान्यताप्राप्त विद्यापीठांशी समकक्ष आहे. महाराष्ट्र शासन व शासनाच्या मान्यताप्राप्त असलेल्या सर्व सरकारी, निमसरकारी, खाजगी संस्था, विविध मंडळे इत्यादींमधील नोकऱ्यांसाठी, नोकरीत बढती मिळण्याकरिता तसेच पुढील शिक्षणासाठी या विद्यापीठाच्या पदव्या इतर विद्यापीठांच्या पदव्यांप्रमाणेच समकक्ष आहेत. महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाने त्यांच्या परीक्षांसाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे विद्यार्थी पात्र असल्याचे यापूर्वीच घोषित केले आहे. आजपर्यंत विद्यापीठाचे अनेक विद्यार्थी केंद्रीय तथा राज्य लोकसेवा आयोगाच्या विविध स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत.

राष्ट्राच्या व राज्याच्या विकास आराखड्यांशी समन्वय साधून, आपल्या विकासविषयक गरजांना अनुरूप विविध शिक्षणक्रम उपलब्ध करून देणे हे मुक्त विद्यापीठांचे ध्येय आहे. तसेच बदलते तंत्रज्ञान व त्या अनुषंगाने बदलणाऱ्या जीवनप्रणालीशी समायोजन साधण्याकरिता समाजाला ज्ञानात्मक आधार पुरविणारे शिक्षणक्रम विकसित करण्यावर मुक्त शिक्षणपध्दतीचा भर आहे. त्यामुळे 'आयुष्यभरासाठी शिक्षण', 'काम करता-करता शिक्षण', 'नोकरी व्यवसायाला आधारभूत ठरणारे कौशल्याधिष्ठित शिक्षण' ह्या संकल्पना प्रत्यक्षात आणून अध्ययनशील समाजाच्या जडणघडणीत विद्यापीठ सहभागी आहे.

'ज्ञानगंगा घरोघरी' विद्यापीठाचे ब्रीदवाक्य असून 'लोकविद्यापीठ' होण्याकडे वाटचाल करीत आहे. समाजाच्या तळागाळातील सर्वांपर्यंत गरजेनुसार शिक्षण पोहचविणे विद्यापीठाचे उद्दिष्ट आहे. मुख्यालय, विभागीय केंद्रे, जिल्हा केंद्रे, अभ्यासकेंद्रे, कार्यस्थळ यांच्यामार्फत विद्यापीठाचे विविध शिक्षणक्रम ग्रामीण, शहरी तसेच आदिवासी भागांतील सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे प्रयत्न केले जात आहेत. मातृभाषेतून शिक्षण उपलब्ध करून देण्याचे या विद्यापीठाचे धोरण असून 'लोकभाषेला ज्ञानभाषेचा दर्जा प्राप्त करून दिला पाहिजे' या यशवंतराव चव्हाण यांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाला अनुसरून हे विद्यापीठ काम करीत आहे.

१.१ मुक्त विद्यापीठाची उद्दिष्टे

१. समाजातल्या शेवटच्या स्तरापर्यंत 'ज्ञानगंगा' पोचवून तसेच शहरी, ग्रामीण व मागास भागातील कष्टकरी, गृहिणी व अन्य प्रौढांना त्यांच्या गरजा लक्षात घेऊन सर्वसाधारण पदवी शिक्षण, व्यावसायिक, तांत्रिक व इतर शिक्षण-प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे. म्हणजेच समाजातील विविध स्तरांमधील ज्ञानात्मक विषमता दूर करण्याचे माध्यम म्हणून कार्य करणे.

२. वय, कालावधी व प्रवेश पात्रतेच्या नियमांचे जोखड दूर करून शिकण्याची इच्छा असणाऱ्या सर्वांना सहजपणे शिक्षण घेता येईल अशी लवचिक व उपक्रमशील मुक्त शिक्षणपध्दती विकसित करणे.

३. पारंपरिक विद्यापीठातील शिक्षण अपूर्ण राहिलेल्या व्यक्तींना त्यांनी पूर्ण केलेल्या शैक्षणिक भागाचे मूल्य विचारात घेऊन मुक्त विद्यापीठाच्या उपलब्ध शिक्षणक्रमात (Credit Transfer System) व पुढील शिक्षणाच्या वाटा मोकळ्या करणे.

४. अनौपचारिक व निरंतर शिक्षणामार्फत तसेच शैक्षणिक विस्तार सेवांच्या उपक्रमांतून विविध कला-कौशल्यांचा विकास करण्याकरिता गुणात्मक शिक्षण उपलब्ध करून देणे, बदलत्या तंत्रज्ञानाशी समायोजित होण्यासाठी प्रौढांना नव्या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देणे, भारताच्या आणि विशेषत: महाराष्ट्राच्या कला-परंपरा, सांस्कृतिक संचित आणि सामाजिक प्रबोधनाचा वारसा यांचे जतन व संवर्धन करण्याकरिता तसेच राष्ट्रीय एकात्मता व व्यक्तित्वाचा एकत्र विकास साधण्याकरिता विविध शिक्षणक्रम विकसित करणे.

५. केवळ शासकीय अनुदानावर अवलंबून न राहता आपल्या प्रशासकीय खर्चाच्या बाबतीत स्वावलंबी होण्यावर भर देऊन त्याकरिता खाजगी व सामाजिक संस्थांचा वित्तीय सहभाग मिळविणे, तसेच संगणकादी आधुनिक उपकरणांचा प्रभावी उपयोग करून किफायतशीर व गुणवत्ताधिष्ठित कार्यप्रणाली विकसित करणे.

०२. विद्याशाखेचा परिचय

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेत मानवी मूल्यांसह मानवनिर्मित कला, भाषा, साहित्य,सर्जनशीलता तसेच कुटुंबसंस्था, राज्यसंस्था, अर्थसंस्था इ. विविध संस्थांच्या रचना, तत्वज्ञान, इतिहास व परंपरांचा अभ्यास केला जातो. २१ व्या शतकातील जागतिक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी बौद्धिक पूर्वतयारी करणे आणि अध्ययनशील समाजासाठी शैक्षणिक संसाधनांचा विकास करणे हे या विद्याशाखेचे ध्येय आहे. व्यक्ती विकासावर भार देणे, व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी सहाय्यभूत ठरणे व व्यक्तीला प्रगतीपथाकडे नेणे ही या विद्याशाखेतील अभ्यासक्रमांची वैशिष्ट्ये आहेत.

२.१ विद्याशाखेची उद्दिष्टे

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

१. विद्यार्थीकेन्द्री शिक्षणक्रम विकसित करणे.
२. मुक्त शिक्षण प्रणालीनुसार लवचिक अध्ययन व अध्यापन पद्धतींचा अवलंब करणे.
३. समाजातील अद्याप शिक्षण पोहोचले नाही अश्या दुर्लक्षित घटकांपर्यंत शिक्षण पोहोचविणे.
४. विद्यार्थ्याला मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे ज्ञानशाखेतील शिक्षणास प्रोत्साहित करणे.
५. नवज्ञानाधारित समाजनिर्मिती करणे.
६. दूरशिक्षणाद्वारे जनसामान्यांपर्यंत पोहोचून लोकविद्यापीठ घडविणे.

२.२ विद्याशाखेची ठळक वैशिष्ट्ये

१. जगभरातील विविध संस्कृती, राष्ट्र-राज्यांच्या जडणघडणीचा, परंपरांचा इतिहास इत्यादींचा प्रमाणपत्र, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पीएच.डी. शिक्षणक्रमाचा समावेश.

२. स्वातंत्र्य,समता,बंधुता,मानवी हक्क इत्यादी मूल्ये तसेच पर्यावरणरक्षणादी चळवळी, मानवी विकास निर्देशांक, शाश्वत विकासाची उद्दिष्टे इत्यादी जागतिक कल्याणकारी संघटनांच्या कार्याचा समावेश.

३. स्त्रियांचे सबलीकरण, वंचितांच्या अस्मितेचे लढे, भाषा,धर्म, प्रदेशांच्या विविधतेतून एकतेसाठी रचलेले नमुना-दर्श यांचा अंतर्भाव.

४. जागतिकीकरण आणि स्थानिक विकासाची सांगड अशा विविध आशयसूत्रांचा अभ्यासक्रमामध्ये समावेश.

५. ग्रंथालय व माहितीशास्त्र, वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन, गांधी विचारदर्शन, मानवी हक्कव ग्राहक संरक्षण अशा विशेष विषयांवर स्वतंत्र शिक्षणक्रम.

६. सिद्धांत आणि व्यवहार यांची सांगड घालणारे उपयोजित अभ्यासक्रम.

७. व्यक्तीच्या सर्जनशीलतेला व कल्पकतेला वाव देणारे अपारंपारिक अभ्यासक्रम.

८. व्यक्तिमत्व विकास आणि व्यावसायिक यशासाठी पूरक कौशल्यांना वाव देणारे अभ्यासक्रम.

९. स्वयं-अध्ययनासाठी लागणाऱ्या नाविन्यपूर्ण कौशल्यांचे शिक्षण.

१०. पायाभूत अभ्यासक्रमात विविध संकल्पनांचे स्पष्टीकरण देण्यावर भर.

११. स्वयंअध्ययन पुस्तके, स्वाध्याय, क्षेत्रीय कार्य, प्रकल्प अभ्यास, वेबमाध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शक सेवा व शैक्षणिक सहाय्य.

१२. प्रत्येक शिक्षणक्रमात आवडीप्रमाणे निवड करता येतील असे पर्याय.

०३. शिक्षणक्रमाविषयी

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयातील पदवी शिक्षणक्रम (B.Lib.& I.Sc) १९९६ साली सुरु केला. महाराष्ट्रात विदर्भ, मराठवाडा, खान्देश, पश्चिम महाराष्ट्र, कोकण व मुंबई अशा सर्व भागांतून या शिक्षणक्रमाला प्रचंड प्रतिसाद मिळाला. आतापर्यंत हजारो विद्यार्थ्यांनी या शिक्षणक्रमाचा लाभ घेतला आहे.

इ.स.२००० पासून विद्यापीठाने पदव्युत्तर पातळीच्या ग्रंथालय व माहितीशास्त्रातील नावीन्यपूर्ण भविष्यकालीन गरजांची पूर्ती करणारा ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयातील निष्णात शिक्षणक्रम (M.Lib & I.Sc) शिक्षणक्रम कार्यान्वित केला आहे. या शिक्षणक्रमासाठी प्रातिनिधिक स्वरूपात महाराष्ट्रात निवडक अभ्यासकेंद्र/ विद्यार्थी सहायता केंद्रे सुरू करण्याचे ठरविण्यात आले. ही अभ्यासकेंद्रे / विद्यार्थी सहायता केंद्रे गुणवत्तेच्या दृष्टीने उच्च दर्जाची राहतील व या केंद्रातील विद्यार्थ्यांना महाराष्ट्रातील नामवंत तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाचा लाभ मिळेल ह्या दृष्टीने विद्यापीठाने या शिक्षणक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विशेष कार्यपद्धती ठरविली आहे.

दर्जेदार अध्ययन साहित्याची निर्मिती करण्यासाठी महाराष्ट्रातील विविध भागांतील तज्ज्ञांचे सहकार्य मिळाले असून १८ मुद्रित पुस्तके,दोन कार्यपुस्तिका व प्रतिवर्षी 'ज्ञानगंगोत्री' ह्या त्रैमासिकाचे ४ अंक असे समृद्ध अध्ययन साहित्य विकसित करण्यात आले आहे. शिवाय विद्यार्थी सहायता केंद्रावर त्या त्या परिसरातील तज्ज्ञांचे दर आठवड्याला मार्गदर्शन आणि वर्षातून एकदा राज्यातील व देशातील नामवंत तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाचे विशेष अभ्यास-शिबिर हे या शिक्षणक्रमाचे खास वैशिष्ट्य आहे. अद्ययावत माहिती-तंत्रज्ञानाचा विपुल वापर आणि इन्फ्लीबनेट प्रणीत SOUL या ग्रंथालय व्यवस्थापन प्रणालीचा अभ्यासक्रमात समावेश करून या शिक्षणक्रमाची गुणवत्ता जागतिक पातळीवरील शिक्षणक्रमाच्या तोडीची व्हावी यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील आहे.

३.१ शिक्षणक्रमाची उद्दीष्टे आणि निष्पत्ती

शिक्षणक्रमाची उद्दीष्टे

१. माहितीचा संग्रह आणि प्रतिप्राप्ती यांचे महत्व जाणून घेणे.
२. माहिती प्रतिप्राप्ती साठी लागणारी कौशल्ये विकसित करणे.
३. ग्रंथालय ही मध्यवर्ती संकल्पना समजून त्या अनुषंगाने मूल्यमापन व व्यवस्थापन समजून घेणे.
४. संशोधन पद्धती आत्मसात करणे.
५. ग्रंथालयात माहिती तंत्रज्ञानाचा अवलंब करणे.

शिक्षणक्रमाची निष्पत्ती

१. माहितीचा संग्रह आणि प्रतिप्राप्ती यांचे महत्व लक्षात येते.
२. माहिती प्रतिप्राप्ती साठी लागणारी कौशल्ये विकसित होतात.
३. ग्रंथालय ही मध्यवर्ती संकल्पना समजून त्या अनुषंगाने मूल्यमापन व व्यवस्थापन समजून घेता येते.
४. संशोधनाबद्दल जागरूकता व आवड निर्माण होते.
५. माहिती तंत्रज्ञानाचा ग्रंथालयीन कामकाजात उपयोग करता येतो.

३.२ प्रवेश-पात्रता

खालील शैक्षणिक पात्रता धारण करणाऱ्यास ग्रंथालय व माहितीशास्त्र निष्णात शिक्षणक्रमासाठी प्रवेश मिळू शकेल.

Fulfilling the following eligibility criterion is essential for enrolling into the Master of Library and Information Science (M.Lib & I.Sc.) Program.

- कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची ग्रंथालय व माहितीशास्त्र पदवी वा समकक्ष पदवी.

  Bachelor of Library and Information Science (B.Lib & I.Sc.) or equivalent Degree from any recognised university.

३.३ शिक्षणक्रम शुल्क

अ.क्र	शुल्क तपशील	शुल्क रुपये
१.	माहितीपुस्तिका शुल्क	५०.००
२.	शैक्षणिक शुल्क	९०९५.००
३.	पात्रता शुल्क	१००.००
४.	नोंदणी शुल्क	२००.००
५.	ओळखपत्र शुल्क	१०.००
६.	ई-सुविधा शुल्क	७०.००
७.	ग्रंथालय शुल्क	१०.००
८.	विद्यार्थी कल्याण शुल्क	५०.००
९.	मा. राज्यपाल कार्यालय उपक्रम शुल्क	३८.००
१०.	क्रीडा शुल्क	५०.००
११.	संवाद पत्रिका शुल्क	१०.००

१२.	विद्यार्थी विमा योजना शुल्क	२०.००
१३.	राष्ट्रीय सेवा योजना शुल्क	१०.००
१४.	आपत्ती व्यवस्थापन शुल्क	१०.००
१५.	अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहायता केंद्र शुल्क	३०००.००
१६.	परीक्षा शुल्क	१९५०.००
१७.	पदवी प्रदान शुल्क	४५०.००
१८.	माजी विद्यार्थी संघ शुल्क	१०.००
	एकूण शुल्क पंधरा हजार एकशे तेहतीस रुपये मात्र	**१५,१३३.००**

❖ **शिक्षणक्रम शुल्कासंबंधी सूचना**

अर्जदाराने प्रवेश घेत असलेल्या शिक्षणक्रमाचे प्रवेश शुल्क माहितीपुस्तिकेत नमूद केल्याप्रमाणे एकत्रित भरणे अनिवार्य आहे.या शुल्कामध्येच अभ्यासकेंद्र/ विद्यार्थी सहायता केंद्राचे शुल्क समाविष्ट आहे. त्यामुळे अभ्यासकेंद्र/ विद्यार्थी सहायता केंद्रावर कोणतेही वेगळे / अधिकचे शुल्क देण्याची आवश्यकता नाही. शुल्क भरण्याबाबतच्या सूचनेनुसार प्रवेश अर्जानंतर दिलेल्या लिंकवरून ऑनलाईन पेमेंट गेटवे वापरून क्रेडिट/डेबिट कार्ड/युपीआय /नेट बँकिंगद्वारे शुल्क भरावयाचे आहे. दिलेल्या लिंक व्यतिरिक्त इतर कुठल्याही लिंकवर भरलेले शुल्क ग्राह्य धरले जाणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची राहील.

ऑनलाईन पद्धतीने प्रवेशप्रक्रियेचा अवलंब करून आपला प्रवेश निश्चित करावा आणि आपण दिलेल्या मोबाईल क्रमांकावर आपला प्रवेश झाल्याचा तसेच तुमचा प्रवेश झाल्यावर येणाऱ्या कायम नोंदणी क्रमांकाचा मेसेज मिळण्याची प्रतीक्षा करावी. आपला प्रवेश निश्चित झाला किंवा कसे याबाबत निवडलेल्या अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहायता केंद्राच्या कायम संपर्कात राहावे.

❖ **पुनर्परीक्षार्थी शुल्क :** पुनर्परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्येक अभ्यासक्रमाकरिता (तात्त्विक परीक्षेसाठी रु. २००/- प्रती अभ्यासक्रम व प्रात्यक्षिक परीक्षेसाठी रु. २२०/- प्रती अभ्यासक्रम)+ रु.१०० /- गुणपत्रक शुल्क द्यावे लागेल. प्रकल्प पुनर्सादरीकरण (संबंधित विद्यार्थ्यास) रु.३३०/-शुल्क आकारले जाईल.

टीप : नियमित विद्यार्थ्याने प्रवेश घेतल्यानंतर डिसेंबर / जानेवारी मध्ये घेतली जाणारी परीक्षा न दिल्यास त्यास पुढील परीक्षा देण्यासाठी परीक्षा शुल्क परत भरावे लागेल. अशा विद्यार्थ्यास पुनर्परीक्षार्थी समजले जाईल.

३.४ कालावधी

UGC Notification of Specification of Degrees, 2014 आणि UGC (ODL Programmes & OL Programmes) Regulations, 2020 नुसार या शिक्षणक्रमाचा कालावधी किमान १ वर्ष राहील. नोंदणी मात्र जास्तीत जास्त २ वर्षांसाठी वैध राहील. त्यानंतर मात्र विद्यार्थ्यास नव्याने प्रवेश प्रक्रियेत सहभागी व्हावे लागेल.

३.५ माध्यम

शिक्षणक्रमाचे माध्यम मराठी असेल. मात्र परीक्षा विभागाच्या पूर्वपरवानगीने अंतिम परीक्षेत उत्तरपत्रिका इंग्रजी व हिंदी भाषेतून लिहिण्यास अनुमती दिली जाईल. प्रश्नपत्रिका, अध्ययन-साहित्य आणि संपर्कसत्रे मात्र मराठी माध्यमातूनच असतील.

३.६ श्रेयांक

हा शिक्षणक्रम एकूण ३२ श्रेयांकांचा आहे. एक श्रेयांक म्हणजे किमान ३० ते ३५ घड्याळी तास अभ्यास करावा लागेल, (तात्त्विक, प्रात्यक्षिक, वाचन, गृहपाठ, इत्यादी.) अशा तऱ्हेने हा शिक्षणक्रम किमान १०४० तासांचा आहे.

३.७ शिक्षणक्रमाची संरचना

अभ्यासक्रम सांकेतांक	अभ्यासक्रमाचे शीर्षक	श्रेयांक	स्वाध्याय/ गृहपाठ	संपर्कसत्रे	
	अनिवार्य			तात्त्विक	प्रात्यक्षिक
LIB010	प्रलेख वर्णन प्रक्रिया, प्रतिप्राप्ती वितरण	४	१	६	-
LIB011	ग्रंथालय आणि माहितीकेंद्राचे व्यवस्थापन	५	१	८	-
LIB012	ग्रंथालय आणि माहितीशास्त्राची संशोधन पद्धती	४	१	६	-
LIB013	ग्रंथालय आणि माहितीशास्त्र : वर्तमान घटना, घडामोडी	३	१	४	-
	ऐच्छिक(कोणतेही दोन)			तात्त्विक	प्रात्यक्षिक
LIB201	शैक्षणिक व संशोधन ग्रंथालये	४	१	६	-
LIB202	ग्रंथालय सेवा व उपक्रम	४	१	६	-
LIB203	ग्रंथेतर साहित्याचे व्यवस्थापन	४	१	६	-
	उपयोजित				
LIB301(T)	माहिती तंत्रज्ञानाचा ग्रंथालयात व माहितीकेंद्रात वापर	२	१	६	-
LIB301(P)	माहिती तंत्रज्ञानाचा ग्रंथालयात व माहितीकेंद्रात वापर	२	-		२०
LIB302	साधननिर्मिती आणि संशोधन प्रकल्प	४	-	२	४
		३६	**-**	**५०**	**२४**

टीप:- १. याखेरीज परिचय आणि उजळणीसाठी ४ संपर्कसत्रे असतील.
२. विद्यार्थ्यानी ऐच्छिक अभ्यासक्रमातील तीनपैकी दोनच विषय निवडावयाचे असल्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याला ६८ संपर्कसत्रास उपस्थित राहावयाचे आहे. या ६८ सत्रांपैकी संशोधन प्रकल्पाची ६ सत्रे व ८ व्या अभ्यासक्रमातील २० प्रात्यक्षिकांपैकी ७०% म्हणजे १४ याप्रमाणे २० संपर्कसत्रांस उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

३.८ अध्ययन साहित्य

अभ्यासक्रम संकेतांक	अभ्यासक्रमाचे / पुस्तकाचे शीर्षक
LIB010	**अभ्यासक्रम : प्रलेख वर्णन प्रक्रिया, प्रतिप्राप्ती वितरण**
	१. विषय निर्देशन, संग्रह आणि प्रतिप्राप्ती
	२. प्रतिप्राप्ती आणि संप्रेषण
LIB011	**अभ्यासक्रम : ग्रंथालय आणि माहितीकेंद्राचे व्यवस्थापन**
	३. व्यवस्थापन मूलतत्वे, कार्यपद्धती आणि मूल्यमापन
	४. ग्रंथालयीन साधनसामग्री आणि सेवा यांचे व्यवस्थापन
LIB012	**अभ्यासक्रम : ग्रंथालय आणि माहितीशास्त्राची संशोधन पद्धती**
	५. संशोधन : व्याख्या आणि पद्धती
	६. माहिती संकलन, विश्लेषण आणि सादरीकरण
LIB013	**अभ्यासक्रम : ग्रंथालय आणि माहितीशास्त्र : वर्तमान घटना, घडामोडी**

	७ ते १० : त्रैमासिक
LIB201	**अभ्यासक्रम : शैक्षणिक व संशोधन ग्रंथालये**
	११. महाविद्यालयीन व विद्यापीठीय ग्रंथालये
	१२. संशोधन ग्रंथालये
LIB202	**अभ्यासक्रम : ग्रंथालय सेवा व उपक्रम**
	१३. सार्वजनिक ग्रंथालये
	१४. शालेय ग्रंथालये
	१५. दप्तरखाने आणि वस्तू संग्रहालये
LIB 203	**अभ्यासक्रम : ग्रंथेतर साहित्याचे व्यवस्थापन**
	१६. मुद्रित ग्रंथेतर साहित्य
	१७. अमुद्रित ग्रंथेतर साहित्य
LIB 301(T)	**अभ्यासक्रम : माहिती तंत्रज्ञानाचा ग्रंथालयात व माहितीकेंद्रात वापर**
	१८. माहिती तंत्रज्ञानाचा परिचय
	१९. ग्रंथालयाचे संगणकीकरण २०. संगणक जाळे व बहुसंज्ञापन माध्यमे
LIB301(P)	**अभ्यासक्रम : माहिती तंत्रज्ञानाचा ग्रंथालयात व माहितीकेंद्रात वापर**
	२१.संगणक आधारीत माहितीसाधने व दळणवळण : कार्यपुस्तक
	२२. SOUL ग्रंथालय संगणकीकरण प्रणाली : कार्यपुस्तक
LIB 302	**अभ्यासक्रम : साधननिर्मिती आणि संशोधन प्रकल्प**
	२३. संशोधन प्रकल्प : स्वरूप व लेखन पद्धती

३.९ अध्ययन पद्धती

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र निष्णात शिक्षणक्रमाचे तात्त्विक आणि उपयोजित असे दोन भाग असतील. या दोन्ही भागांसाठी स्वाध्याय अनिवार्य आहेत.

१. तात्त्विक

विद्यार्थ्यांना तात्त्विक भाग शिकविण्यासाठी विविध अभ्यासक्रमांची पुस्तके स्वयंअध्ययन करण्याच्या दृष्टीने तयार केली आहेत. विषय "LIB 013 ग्रंथालय आणि माहितीशास्त्र: वर्तमान घटना, घडामोडी" करिता पुस्तकांऐवजी त्रैमासिक नियतकालिक 'ज्ञानगंगोत्री' विद्यार्थ्यांना, विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

२. उपयोजित

विद्यार्थ्यांना तात्त्विक भागाच्या अध्ययनाबरोबर माहिती तंत्रज्ञान व प्रकल्प या दोन विषयांत उपयोजन करावयाचे आहे.

१. माहिती तंत्रज्ञान : या विषयात तात्त्विक भागाबरोबरच संगणक व SOUL च्या हाताळणीबाबत नेमून दिलेली प्रात्यक्षिके करावयाची आहेत त्याकरिता कार्यपुस्तिकांचा वापर करावयाचा आहे.

२. प्रकल्प : विद्यार्थ्यांने विशिष्ट विषयावर संशोधनपर प्रकल्प सादर करावयाचा आहे. त्यासाठी अध्ययन साहित्यातील पुस्तकांचा आधार घ्यावयाचा आहे व नेमून दिलेल्या समंत्रकाचे मार्गदर्शन घ्यावयाचे आहे.

❖ स्वाध्याय/ गृहपाठ

गृहपाठ विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येतील. गृहपाठ प्रश्नांची उत्तरे लिहिण्यासाठी विद्यापीठाने पोर्टलवर बारकोड असलेली पृष्ठे उपलब्ध करून दिली आहेत. या पृष्ठांची प्रिंट काढून त्यावर स्वहस्ताक्षरात गृहपाठ प्रश्नांची उत्तरे लिहावीत. त्यांचे स्कॅन करून .pdf फाईल पोर्टलवर अपलोड करावी. गृहपाठ अपलोड करण्यासंदर्भातील सविस्तर सूचना ४.१.१ मध्ये दिलेल्या आहेत त्यांचे पालन करून गृहपाठ सादर करावेत.

❖ संपर्कसत्रे

- अभ्यासकेंद्रावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी प्रत्येक अभ्यासक्रमासाठी संपर्कसत्रे आयोजित करण्यात येतील.
- प्रत्येक संपर्कसत्र दोन घड्याळी तासांचे राहील.
- एका श्रेयांकास १.५ संपर्कसत्रे याप्रमाणे संपर्कसत्रांची संख्या ठरविण्यात आली आहे.
- उपयोजित अभ्यासक्रमासाठी संपर्कसत्राची आखणी करताना अभ्यासकेंद्रांनी पटावरील विद्यार्थी संख्या सर्वसाधारणपणे दोन तुकड्यांत विभागून संपर्कसत्रे घेण्यात येतील. या तुकडया दोनपेक्षा अधिक असणार नाहीत.
- परिचय व उजळणीसाठी अनुक्रमे वर्षारंभी व वर्षअखेरीस प्रत्येकी दोन संपर्कसत्रे राहतील..
- संपर्कसत्रे अभ्यासकेंद्र/ विद्यार्थी सहायता केंद्रांमध्ये शनिवारी सायंकाळी व रविवारी सकाळी अथवा अभ्यासकेंद्र, विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या सोईच्या वेळी आयोजित करण्यात येतील, त्यांचे वेळापत्रक अभ्यासकेंद्राच्या सूचना फलकावर केंद्र संयोजक वेळोवेळी जाहीर करतील.

❖ अभ्यासक्रमनिहाय संपर्कसत्राची संख्या पुढीलप्रमाणे असेल:

अ.क्र	तपशील	अभ्यासक्रम संख्या	एकूण श्रेयांक	एकूण संपर्कसत्रे
१.	आवश्यक अभ्यासक्रम	४	१६	२४
२.	ऐच्छिक अभ्यासक्रम	३ पैकी २	०८	१२+६
३.	उपयोजित अभ्यासक्रम	२ (तुकड्या २)	०८	२४
४.	परिचय व उजळणीसाठी	--	--	०४
	एकूण	८	३२	६४+६

टीप: याखेरीज विशेष मार्गदर्शन शिबिरासाठी ९ संपर्कसत्राची तरतूद आहे तसेच तिसऱ्या ऐच्छिक विषयाकरिता अधिक ६ सत्रे दाखविली आहेत.

❖ शिबिर

प्रत्येक अभ्यासकेंद्र/विद्यार्थी सहायता केंद्रावर विशेष मार्गदर्शनासाठी शिबिराचे आयोजन केले जाईल. हे शिबिर तीन दिवसांचे असेल. त्यात प्रकल्पा बाबत मार्गदर्शन व निबंध सादरीकरण करण्यात येईल. शिबिराचा तपशील आणि निबंधाचे विषय अभ्यासकेंद्र/ विद्यार्थी सहायता केंद्रावरुन उपलब्ध होतील. तसेच शिबिर मार्गदर्शिका विद्यापिठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येईल. विद्यार्थ्यांनी ह्या मार्गदर्शिकेची प्रत काढून आपल्याकडे ठेवावी.

१. शैक्षणिक व्यवस्थापन (तज्ज्ञांची निवड, विषयाची निवड व वेळापत्रक) विद्यापीठाच्या मुख्यालयातील विद्याशाखेच्या संमतीने अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहायता केंद्र करतील. या शिबिरासाठी किमान दोन तज्ज्ञांना निमंत्रित करण्यात येईल.
२. विद्यार्थ्यांना हे शिबिर अनिवार्य असेल, शिबिर पूर्ण न केल्यास अंतिम परीक्षेस बसता येणार नाही.
३. अपवादात्मक परिस्थितीत एखाद्या विद्यार्थ्यास त्याच्या केंद्रावरील शिबिरास हजर राहता आले नाही तर पूर्वपरवानगीने त्यास दुसऱ्या केंद्रावरील शिबिरास हजर राहता येईल.
४. शिबिरासाठीचे शुल्क रु. ५००/- विद्यार्थ्याने दिलेल्या मुदतीत आपल्या अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहायता केंद्रावर जमा करावे.

❖ उपस्थिती

१. संमंत्रण तासिकांना विद्यार्थ्यांची उपस्थिती ही संपूर्णपणे ऐच्छिक आहे. मात्र अशा तासिकांना नियमित उपस्थित राहणे हे विद्यार्थ्यांच्या फायद्याचे आहे.
२. प्रात्यक्षिकांसाठी ७०% पूर्णवेळ उपस्थिती अनिवार्य आहे.
३. शिबिरासाठी संपूर्ण काळ उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

या संदर्भात कार्यालयीन सुकरतेसाठी सर्व अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहायता केंद्रांनी आपापल्या केंद्रावरील विद्यार्थ्यांचीच प्रात्यक्षिकांना व शिबिरास उपस्थित असल्याची प्रमाणपत्रे मुख्यालयाकडे अंतिम परीक्षेपूर्वी एक महिना आधी सादर करावीत. ज्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत असे प्रमाणपत्र नसेल त्यांना अंतिम परीक्षेस बसता येणार नाही.

०४. मूल्यमापन पद्धती

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र पदव्युत्तर शिक्षणक्रम ३२ श्रेयांकांचा आहे. एक वर्षाच्या कालावधीत ही पदवी मिळवताना एकूण ८ अभ्यासक्रम पूर्ण करावयाचे आहेत. या अभ्यासक्रमाचे मूल्यमापन दोन प्रकारे करण्यात येईल.

१. अंतर्गत मूल्यमापन (अध्यापनाच्या कालावधीत दिलेल्या स्वाध्याय व कार्यपुस्तिका यांच्या साहाय्याने)

२. अंतिम परीक्षा (अध्ययन पूर्ण झाल्यावर विद्यापीठाने घेतलेल्या लेखी, प्रात्यक्षिक, प्रकल्प आणि तोंडी परीक्षेच्या साहाय्याने)

४.१ अंतर्गत मूल्यमापन

- **स्वाध्यायाचे/ कार्यपुस्तिकेचे नियम** : अंतर्गत मूल्यमापनात स्वाध्यायाचा/ गृहपाठाचा समावेश आहे. प्रत्येक स्वाध्याय २० गुणांचा असेल. तात्त्विक भागांसाठी स्वतंत्र स्वाध्याय दिले जातील. (LIB301P) माहिती तंत्रज्ञानाचा ग्रंथालयात व माहितीकेंद्रात वापर (प्रात्यक्षिक) कार्यपुस्तिका २५ गुणांची असून इंटरनेट व होमपेज ब्राऊझिंग, सी.डी. रॉम सर्च व ई-मेल प्रात्यक्षिक यावर आधारित १५ गुणांची कार्यपुस्तिका 'अ' व SOUL ग्रंथालय प्रणालीवर आधारित १० गुणांची कार्यपुस्तिका 'ब' असेल. या अभ्यासक्रमासाठी गृहपाठ प्रश्न दिले जाणार नाहीत.
- अंतर्गत मूल्यमापनात प्रत्येक अभ्यासक्रमाकरिता गृहपाठ देण्यात येईल. गृहपाठ विद्यार्थ्यांना एकदाच दिले जातात. गृहपाठाचे प्रश्न विद्यापीठाच्या www.ycmou.ac.in किंवा http://ycmou.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येतील. विद्यार्थ्यांनी गृहपाठाचे प्रश्न अभ्यासकेंद्र/ विद्यार्थी सहायता केंद्राच्या सहाय्याने अथवा स्वतः डाऊनलोड करून घ्यावेत.

४.१.१ अंतर्गत मुल्यमापनासाठी गृहपाठ ऑनलाईन अपलोड करण्याबाबतच्या सूचना

- **विद्यार्थ्यांसाठी सूचना**

अंतर्गत मूल्यमापनासाठी विद्यार्थ्यांनी **स्वहस्तलिखित गृहपाठ** (Home Assignment) विद्यापीठाच्या पोर्टलवर अपलोड करणे अनिवार्य आहे. गृहपाठ अपलोड करताना खालील सूचनांचे पालन करावे.

१. गृहपाठासाठी आपण https://asm.ycmou.org.in/ या पोर्टलवर उपलब्ध असलेले Student User Guide काळजीपूर्वक वाचावे. तसेचआपल्या १६अंकी कायम नोंदणी क्रमांकाचा (PRN) वापर करून नोंदणी करावी.

२. पोर्टलवर यशस्वीपणे नोंदणी (लॉगीन) केल्यावर आपल्याशी संबंधित अभ्यासक्रमांची संपूर्ण माहिती दिसेल. या पेजवर गृहपाठ लिहिण्यासाठी बारकोडअसलेली कोरी पृष्ठे दिलेली आहेत. आवश्यकतेनुसार या पृष्ठांच्या प्रिंट काढून घ्याव्यात आणि त्यावर स्वहस्ताक्षरात गृहपाठ प्रश्नोत्तरे लिहावीत.

३. पाच गुणांच्या प्रश्नाची उत्तरे किमान ५० ते ६० शब्दांत लिहावीत. सर्व उत्तरे मुद्देसूद असावीत. गृहपाठ प्रश्न क्रमवार सोडवावेत. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर स्वतंत्र पृष्ठावर लिहिणे अपेक्षित आहे. प्रश्नाचे उत्तर एका पृष्ठावर बसत नसल्यास शेवटी कृ.मा.प. / P.T.O. लिहावे, तसेच पुढील पृष्ठावर प्रश्न क्रमांक नोंदवून त्यापुढे उर्वरित उत्तर लिहावे.(उदा. Q-1 Continued...)

४. प्रत्येक अभ्यासक्रमाचा गृहपाठ लिहून झाल्यानंतर पृष्ठांच्या क्रमानुसार त्याची .pdf फाइल तयार करावी. तुमची .pdf फाईल सुस्पष्ट स्कॅन केलेली, वाचनीय असावी. स्कॅन करताना कोणतेही पृष्ठ ओव्हरलॅप होणार नाही, वेडीवाकडे, तिरपे किंवा फोल्ड होणार नाही याची काळजी घ्यावी. प्रत्येक पृष्ठाची साईज किमान 3 MB आणि सर्वपृष्ठे मिळून फाईलची साईज जास्तीत जास्त 20 MB पेक्षाअधिकअसू नये.

५. गृहपाठ अपलोड करण्यासाठी https://asm.ycmou.org.in/ या पोर्टलला भेटद्यावी. अपलोड झालेल्या गृहपाठाची प्राथमिक तपासणी अभ्यासकेंद्र/ विद्यार्थी सहायता केंद्रामार्फत करण्यात येईल. प्राथमिक तपासणी झाल्यावर पात्र (Approved) ठरलेल्या गृहपाठांचे गुणदान अभ्यासकेंद्र/ सहायता केंद्रावरील संमंत्रकांमार्फत करण्यात येईल.

६. अपलोड केलेली पृष्ठे अवाचनीय असतील, विषयानुसार अपलोड केलेले नसतील, स्कॅन केलेली पृष्ठे वेडीवाकडी, तिरपी किंवा ब्लर असतील,कोरी पृष्ठे स्कॅन केलेली असतील तरअशा गृहपाठांचे मूल्यमापन केले जाणार नाही. असे गृहपाठ अस्वीकृत (Reject) केले जातील, याची नोंद घ्यावी. गृहपाठ अस्वीकृतीची (Rejection) माहिती विद्यार्थ्यांना आपल्या प्रोफाईलमध्ये पहायला मिळेल.

७. पोर्टलवरील नोंदणी, गृहपाठ अपलोड करण्यापासून ते गृहपाठ तपासणीपर्यंतची (गृहपाठ स्वीकारले किंवा अस्वीकृत (Reject) केले) इत्यादी सर्व माहिती आपल्या प्रोफाईलवर तसेच ई-मेलवर मिळेल. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपले प्रोफाईल आणि इमेल वेळोवेळी तपासणे, तसेचअभ्यासकेंद्राच्या सतत संपर्कात राहणेअपेक्षितआहे.

८. नोंदणी, सबमिशन, रि-सबमिशन या सर्व प्रक्रिया एका विशिष्ट कालमर्यादेत पूर्ण करायच्या आहेत. विद्यापीठाने निर्धारित केलेल्या वेळेनंतर गृहपाठ अपलोड करता येणार नाहीत. निर्धारित कालावधीतच विद्यार्थ्यांनी आपले गृहपाठअपलोड करणे अनिवार्यआहे.

९. कोणत्याही कारणास्तव अस्वीकृत (Reject) झालेले गृहपाठ विद्यार्थ्यांच्या लॉग-ईनला पुन्हा अपलोड करण्यासाठी (रि-सबमिशनसाठी) उपलब्ध होतील. रि-सबमिशन देखील विहित कालावधीतच पूर्ण करावयाचे आहे. निर्धारित केलेला कालावधी संपुष्टात आल्यावर गृहपाठ अपलोड करता येणार नाही. विद्यार्थ्यांनी याबाबत निष्काळजीपणा केल्यास त्यांच्या गुणपत्रिकेतील अंतर्गत गुण (CA) रकान्यात गैरहजर Absent (Ab) अशी नोंद होईल.

१०. अत्यंत महत्वाचे : गृहपाठ लिहिण्यासाठी आपल्याच लॉगीनमध्ये उपलब्ध असलेल्या पृष्ठांचा वापर करावा. आपल्या लॉगीनमधील पृष्ठांवर आपला बारकोड असल्याने, अन्य कोणाच्याही लॉगीनमधील पृष्ठांचा किंवा इतर कोणत्याही पृष्ठांचा वापर केल्यास गृहपाठ अस्वीकृत(Reject) होतील.

११.गृहपाठ संबंधित वर्षात एकदाच स्वीकारले जातील. कोणत्याही कारणास्तव गृहपाठ सादर न केल्यास किंवा त्यात अनुत्तीर्ण झाल्यास विहित परीक्षा शुल्क भरून चालू शैक्षणिक वर्षातील गृहपाठाचे पुनर्सादरीकरण करावे.

❖ अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहायता केंद्रासाठी सूचना

१. अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहायता केंद्रांनी https://asm.ycmou.org.in/ पोर्टलला भेट देऊन, नोंदणी करावी. त्यानंतर लॉगीनमध्ये प्रथम त्यांच्या केंद्रावरील समंत्रकांच्या माहितीची नोंद करावी. अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहायता केंद्रांच्या लॉगीनमध्ये किती विद्यार्थ्यांनी गृहपाठ सादर केले आहेत याची माहिती दिसेल. त्यानुसार विद्यार्थ्यांकडून गृहपाठ अपलोड करण्याबाबत पाठपुरावा करावा आणि निर्धारित कालावधीत सर्व विद्यार्थ्यांकडून गृहपाठ अपलोड करून घ्यावेत.याबाबत विद्यार्थ्यांना योग्य ते मार्गदर्शन व सहकार्य करावे.

२. अभ्यासकेंद्र/ विद्यार्थी सहायता केंद्रानी आपल्या लॉगीनमध्ये आलेल्या गृहपाठाची प्राथमिक तपासणी तातडीने करावी. योग्य गृहपाठाचे संबंधित विषयांच्या समंत्रकांकडून परीक्षण करावे. योग्य प्रकारे अपलोड न झालेले गृहपाठ अस्विकृत करून, ते पुन्हा संबंधित विद्यार्थ्यांकडून लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी पाठ पुरावा करावा.अभ्यासकेंद्र/ विद्यार्थी सहायता केंद्रांनी परीक्षण / तपासणी प्रक्रिया विद्यापीठाने निर्धारित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक आहे.

३. विद्यार्थी आणि अभ्यासकेंद्र/ विद्यार्थी सहायता केंद्रे यांना काही तांत्रिक अडचण उद्भवल्यास अथवा अधिक माहितीसाठी 8055253072 या भ्रमणध्वनीवर तसेच oasishelpdesk22@gmail.com या ईमेलवरआपण संपर्क करू शकता.

४.२ अंतिम मूल्यमापन

अंतिम परीक्षा लेखी व प्रात्यक्षिक, प्रकल्प व तोंडी स्वरूपाची असेल. ज्या अभ्यासक्रमातील तात्त्विक आणि प्रात्यक्षिक, प्रकल्प आणि तोंडी भागांची परीक्षा स्वतंत्रपणे घेतली असेल, त्या भागांतील प्राप्त गुणांनुसार मूल्यमापन करण्यात येईल.

❖ लेखी परीक्षा

प्रत्येक अभ्यासक्रमाची ८० गुणांची ३ तास वेळ असणारी अंतिम परीक्षा घेण्यात येईल. प्रत्येक अभ्यासक्रमास ८० गुणांची एक याप्रमाणे प्रती वर्ष सहा अभ्यासक्रमांकरिता ८० गुणांच्या ६ प्रश्नपत्रिका असतील. प्रत्येक प्रश्नपत्रिकेत २० गुणांचे ४ प्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नात प्रत्येकी ५ गुणांचे ५ उपप्रश्न असतील. प्रत्येक प्रश्ना-तील पाचपैकी चार उप-प्रश्न सोडवावयाचे असतील. विद्यार्थ्यांना प्रत्येक अभ्यासक्रमात ८० पैकी मिळालेले गुण गुणपत्रिकेत स्वतंत्रपणे (UA) दर्शविण्यात येतील. प्रत्येक अभ्यासक्रमात उत्तीर्ण होण्याकरिता विमान ४०% गुण मिळविणे अनिवार्य असेल. माहिती तंत्रज्ञानाचा ग्रंथालय व माहितीकेंद्रात वापर' या तात्विक अभ्यासक्रमासाठी ४० गुणांची प्रश्नपत्रिका असेल. २० गुणांचे २ प्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नात प्रत्येकी ५ गुणांचे ५ उपप्रश्न असतील. प्रत्येक प्रश्ना-तील पाचपैकी चार उप-प्रश्न सोडवावयाचे असतील.

❖ तात्त्विक अभ्यासक्रमाच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप

कृपया प्रश्नपत्रिकेचा नमुना परिशिष्ट मध्ये पाहावा.

❖ प्रात्यक्षिक परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप

('माहिती तंत्रज्ञानाचा ग्रंथालय व माहितीकेंद्रात वापर' या अभ्यासक्रमासाठी) कमाल गुण: ५०, एकूण वेळ २ तास

❖ प्रात्यक्षिक परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे गुणविभाजन

अ. क्र.	प्रात्यक्षिक परीक्षा	गुण	वेळ मर्यादा
१.	इंटरनेट ब्राउझिंग व होमपेज ब्राउझिंग	१०	३० मिनिटे
२.	सी.डी.रोम सर्च	१०	१५ मिनिटे
३.	इ-मेल	१०	१५ मिनिटे
४.	SOUL ग्रंथालय प्रणाली	२०	१ तास
	एकूण	**५०**	**२ तास**

❖ प्रकल्प

या अभ्यासक्रमात विद्यार्थ्याने संशोधन व सर्वेक्षणाच्या स्वरूपाचा प्रकल्प सादर करावयाचा आहे. प्रकल्प दोन प्रतीत सादर झाल्याशिवाय अंतिम परीक्षेस बसता येणार नाही. त्यासाठी विद्यार्थी सहायता केंद्रावरील संमंत्रक विद्यार्थ्यास मार्गदर्शन करतील. अंतिम परीक्षेच्या वेळी प्रकल्पाचे मूल्यांकन अंतर्गत व बहिःस्थ परीक्षक करतील. त्यासाठी १०० गुण असतील. पैकी प्रकल्प लेखनासाठी ७५ गुण असतील आणि त्यावर आधारित तोंडी परीक्षेसाठी २५ गुण असतील.

मूल्यमापन प्रक्रियेत प्रकल्पाबाबत पुढीलप्रमाणे नियम असतील.

१. अंतिम परीक्षेच्या वेळी एकूण मूल्यमापनात प्रकल्पाच्या मूल्यमापनाचाही समावेश असेल. त्यासाठी विद्यापीठाने प्रकल्पावर आधारित तोंडी परीक्षा ठेवलेली असून त्यात प्रकल्पाचे मूल्यमापन करण्यात येईल.
२. जे विद्यार्थी प्रकल्प सादर करतील, परंतु तोंडी परीक्षेस अनुपस्थित राहतील, त्यांच्या बाबतीत मूल्यमापन प्रक्रिया पूर्ण होत नसल्याने अशा विद्यार्थ्यांची प्रकल्पाच्या परीक्षेत अनुपस्थिती धरण्यात येईल व त्यास पुन्हा तोंडी परीक्षा द्यावी लागेल.

३. प्रकल्प विषय, लेखन व संशोधन पूर्णपणे स्वतंत्र, नवा आणि केवळ स्वतःचा असावयास हवा. प्रकल्प सादर करतेवेळी तसे प्रमाणपत्र विद्यार्थ्याला सादर करावे लागेल.

४. प्रकल्प तयार करताना संशोधन पद्धतीचा उपयोग करून प्रकल्प लेखन करावयाचे आहे.

५. सदर प्रकल्पाच्या **दोन प्रती अंतिम परीक्षेपूर्वी दोन महिने विद्यार्थी सहायता केंद्रावर सादर कराव्या लागतील.** त्याशिवाय परीक्षा अर्ज स्वीकारला जाणार नाही.

६. प्रकल्पाचे सादरीकरण प्रकल्पाकरिता ए-४ आकाराची पृष्ठे वापरावीत. प्रकल्प सामान्यतः १०० ते १२० पृष्ठांच्या मर्यादेत असावा. पृष्ठावरील मजकूर टंकलिखित अथवा अक्षरजुळणीद्वारे सादर करावा. प्रकल्पाची बांधणी प्रबंधाच्या स्वरूपाची असून मुखपृष्ठावर अत्यावश्यक मजकूर एम्बॉसिंग किंवा स्क्रीन प्रिंट केलेला असावा.

❖ **प्रकल्पातील मजकुराचा क्रम पुढीलप्रमाणे असावा :**

i. शीर्षक पृष्ठ
ii. विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र (वरील क्र.३च्या संदर्भात)
iii. मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र
iv. अनुक्रमणिका
v. संक्षेप चिन्हांची यादी
vi. तक्ते, कोष्टके, चित्रे असल्यास प्रत्येकाची स्वतंत्र यादी
vii. प्रकरणे

❖ **प्रकरणांची मांडणी पुढीलप्रमाणे असावी.**

प्रकरण १ : प्रास्ताविक स्वरूपाचे असेल, यात विषयाची निवड, उद्दिष्टे, व्याप्ती, सर्वेक्षण वा संशोधन पद्धती आणि प्रकल्पाचा आराखडा सादर केलेला असेल.

प्रकरण २ : पूर्वाभ्यासाचे समालोचन असेल.

पुढील ३ ते ४, ५ आदी प्रकरणात आशयाची तर्कानुसार विभागणी मांडलेली असेल. यात तथ्य संकलन, अन्वयार्थ शोधन, विश्लेषण, सिद्धांतन यांचा समावेश असेल. शेवटच्या प्रकरणात उपसंहार व निष्कर्ष असतील. शेवटी आवश्यकतेनुसार पुढील परिशिष्टे असतील.

i. संदर्भसाधनाची सूची
ii. विषय, व्यक्तिनाम सूची
iii. उपयोजिलेल्या पारिभाषिक संज्ञांचे स्पष्टीकरण
iv. प्रश्नावलीचा नमुना
v. मुलाखतीची संहिता
vi. छायाचित्रे

७. जे विद्यार्थी प्रकल्पात अनुत्तीर्ण होतील त्यांना पुनर्परीक्षेसाठी नव्याने प्रकल्प सादर करावा लागेल व त्यासाठी स्वतंत्रपणे प्रकल्प परीक्षा शुल्क भरावे लागेल.

८. प्रकल्प मूल्यमापन पद्धती - प्रकल्प केंद्रामार्फत मुख्यालयाकडे अंतिम परीक्षेपूर्वी दोन महिने आधी पाठवले जातील. प्रकल्प परीक्षेसाठी अंतर्गत परीक्षक व बहिःस्थ परीक्षक असतील. ७५ गुणांच्या परीक्षेसाठी अंतर्गत व बहिःस्थ परीक्षकाच्या गुणांची सरासरी काढली जाईल.

७५ गुणांची विभागणी पुढीलप्रमाणे असेल –

१.	विषय निवडीची भूमिका व व्याप्ती	५ गुण
२.	संशोधन व सर्वेक्षण पद्धती	५ गुण
३.	पूर्वाभ्यासाचे समालोचन	१० गुण
४.	तथ्यसंकलन व अन्वयार्थशोधन	१५ गुण
५.	विश्लेषण व सिद्धांतन	१५ गुण
६.	उपसंहारातील प्रमेय पडताळा, आशयसूत्रांचे व्यवस्थापन, निष्कर्षांची मांडणी व भविष्यवेध	१० गुण
७.	संदर्भसाधने, सूची व परिशिष्टांचा उपयोग	१० गुण
८.	शुद्धलेखन	२ गुण
९.	प्रकल्पाची बांधणी, वाचनीयता, पृष्ठक्रम व बाह्य सजावट	३ गुण
	एकूण	**७५ गुण**

❖ तोंडी परीक्षा

२५ गुणांची तोंडी परीक्षा प्रकल्पावर आधारित असेल. ही परीक्षा अंतर्गत व बहिःस्थ परीक्षक घेतील. दोघांनी दिलेल्या गुणांची सरासरी काढली जाईल.

२५ गुणांची विभागणी

१. सादरीकरण (०५ गुण)

उद्दिष्टे, व्याप्ती	०१ गुण
सर्वेक्षण / संशोधन पद्धती	०१ गुण
पूर्वाभ्यास	०१ गुण
आशयसूत्र	०१ गुण
निष्कर्ष/शोधन/सिद्धांतन	०१ गुण

२. परीक्षकांचे प्रश्न-विषय (१५ गुण)

विषयाची निवड	०१ गुण
संशोधन पद्धती	०२ गुण
आशय	०६ गुण
संदर्भसूची	०१ गुण
निष्कर्ष	०२ गुण
परिशिष्टे	०३ गुण

३.सर्वसाधारण निरीक्षण (०५ गुण)

आत्मविश्वास	०१ गुण
संभाषण कौशल्य	०१ गुण
मुद्देसूद मांडणी / भाषाशैली	०१ गुण
शिष्टाचार	०१ गुण
आकलन	०१ गुण

१. मूल्यमापन तक्ता

अ. क्र.	अभ्यासक्रमाचे नाव व संकेतांक	श्रेयांक	मूल्यमापन आराखडा		
			अंतर्गत मूल्यमापन		अंतिम 80% महत्व प्रमाण प्रश्नपत्रिका
			गृहपाठ संख्या	कमाल गुण	कमाल गुण
	अनिवार्य				
१.	प्रलेख वर्णन प्रक्रिया, प्रतीप्राप्ती वितरण (LIB010)	४	१	२०	८०
२.	ग्रंथालय आणि माहितीकेंद्राचे व्यवस्थापन (LIB011)	५	१	२०	८०
३.	ग्रंथालय आणि माहितीशास्त्राची संशोधन पद्धती (LIB012)	४	१	२०	८०
४.	ग्रंथालय आणि माहितीशास्त्र: वर्तमान घटना, घडामोड (LIB013)	३	१	२०	८०
	ऐच्छिक				
५.	शैक्षणिक व संशोधन ग्रंथालये (LIB201)	४	१	२०	८०
६.	ग्रंथालय सेवा व उपक्रम (LIB202)	४	१	२०	८०
७.	ग्रंथेतर साहित्याचे व्यवस्थापन (LIB203)	४	१	२०	८०
	उपयोजित				
८.	माहिती तंत्रज्ञानाचा ग्रंथालयात व माहितीकेंद्रात वापर (LIB301(T))	२	१	२०	तात्त्विक ५०
९.	माहिती तंत्रज्ञानाचा ग्रंथालयात व माहितीकेंद्रात वापर (LIB301(P))	२	-	-	प्रात्यक्षिक ५०
१०.	साधननिर्मिती आणि संशोधन प्रकल्प (LIB302)	४	-	-	प्रकल्प ७५ तोंडी २५
	एकूण	३२			८००

२. वर्गपरिक्षेत्र तक्ता

गुणांची टक्केवारी	वर्ग
७५ % किंवा त्यापेक्षा अधिक	प्रथम (विशेष गुणवत्तेसह)
६० % किंवा त्यापेक्षा जास्त परंतु ७५ % पेक्षा कमी	प्रथम
५५ % ते ५९.९९	उच्च द्वितीय
५० % ते ५४.९९	द्वितीय
४० % किंवा त्यापेक्षा जास्त परंतु ५० % पेक्षा कमी	तृतीय
४० % पेक्षा कमी	अनुत्तीर्ण

प्रत्येक अभ्यासक्रमाच्या अंतर्गत मूल्यमापन व अंतिम परीक्षा या दोन घटकांना मिळालेल्या गुणांचे एकत्रीकरण करून त्या संयुक्त अभ्यासक्रमाचे गुण काढले जातील. असे करताना अंतर्गत मूल्यमापन आणि अंतिम परीक्षा या घटकाचे मूल्यमापन अनुक्रमे ३०:७० असे राहील.

३. उत्तीर्णतेचे नियम

१. प्रत्येक अभ्यासक्रमाच्या अंतिम परीक्षेत व स्वाध्यायात किमान ४०% गुण मिळविणे तसेच प्रात्यक्षिक भागात आणि प्रकल्पात किमान ५०% गुण मिळविणे अनिवार्य आहे.

२. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र निष्णात शिक्षणक्रम यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी ५०% गुण मिळवणे अनिवार्य आहे म्हणजेच संपूर्ण शिक्षणक्रमाची अंतिम टक्केवारी ५० असणे अनिवार्य आहे.

३. संपूर्ण शिक्षणक्रमाची अंतिम टक्केवारी ५० पेक्षा कमी असेल तर विद्यार्थ्यास पुनर्परीक्षार्थी म्हणून अंतिम परीक्षा देता येईल. त्यासाठी पुनर्परीक्षार्थी म्हणून योग्य ते परीक्षा शुल्क भरावे लागेल.

❖ 'ग्रंथालय आणि माहितीशास्त्र वर्तमान घटना, घडामोडी (LIB013)' ह्या अभ्यासक्रमाच्या पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यासाठी सूचना

वरील अभ्यासक्रमाची प्रश्नपत्रिका त्या त्या वर्षाच्या नवीन वर्तमान घटना, घडामोडींवर आधारलेली असेल, त्यासाठी अध्ययन साहित्य त्या त्या वर्षाच्या 'ज्ञानगंगोत्री' त्रैमासिकात प्रसिद्ध झालेले असेल. सदर त्रैमासिकाचे अंक विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून स्वतः डाऊनलोड करून घ्यावेत. अथवा अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहायता केंद्रांकडून उपलब्ध करून घ्यावेत.

▪ गुणवत्ता वाढीसाठी परत परीक्षा देण्याची संधी

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र निष्णात शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांना नेट/ सेट परीक्षा देण्यासाठी गुणांची विशिष्ट टक्केवारी आवश्यक असते, ज्या विद्यार्थ्यांना निर्धारित गुणांपेक्षा कमी गुण प्राप्त झाले आहेत त्यांना गुणवत्ता वाढीसाठी परत परीक्षा देण्याची संधी विद्यापीठाने उपलब्ध करून दिलेली आहे. याबाबतची नियमावली खालीलप्रमाणे:

१. गुणवत्ता वाढ योजना ही उच्च वर्ग प्राप्त करण्याकरिता विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. ज्या विद्यार्थ्यांना प्राप्त गुणांपेक्षा (किमान ५०%) जास्त गुण प्राप्त करायचे असतील त्यांना ही योजना असेल.

२. गुणवत्ता वाढीची संधी संचालक, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा आणि परीक्षा नियंत्रक यांच्या परवानगीने प्राप्त करता येईल.

३. विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यानंतर लगेच येणाऱ्या दोन परीक्षांकरिता ही संधी असेल. **ही संधी पुनर्नोंदणीच्या विद्यार्थ्यांना नसेल. तसेच विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यावर त्याने पदवी प्रमाणपत्र घेण्या-आधीच त्यास गुणवत्ता वाढीची** संधी राहील. एकदा प्रमाणपत्र (Degree Certificate) घेतल्यावर त्यास संधी राहणार नाही,

४. या योजनेअंतर्गत कोणत्याही ३ अभ्यासक्रमांची लेखी परीक्षा देता येईल. यासाठी विद्यापीठाने निर्धारित केलेले परीक्षा शुल्क (गुणपत्रक व प्रमाणपत्र) असेल. त्यासाठी परीक्षा अर्ज भरावा लागेल.

५. परीक्षा शुल्क विद्यापीठाने निर्धारित केलेल्या पद्धतीनेच स्वीकारले जाईल.

६. विद्यार्थ्यास गुणवत्ता वाढीचा अर्ज करतानाच सदर शिक्षणक्रमाची यापूर्वी मिळालेली मूळ गुणपत्रके विद्यापीठात परीक्षा कक्षात जमा करावी लागतील.

७. प्रत्येक अभ्यासक्रमाला त्या त्या वेळी निश्चित केलेल्या परीक्षा शुल्काच्या दुप्पट शुल्क आकारण्यात येईल.

८. अशा विद्यार्थ्यांना फक्त तात्त्विक अभ्यासक्रमाच्या अंतिम परीक्षेस बसता येईल. प्रात्यक्षिक, स्वाध्याय व प्रकल्प यांची परीक्षा देता येणार नाही.

९. अशा विद्यार्थ्यांसाठी Condonation व Getting Marks for Higher Class या नियमांची सवलत मिळणार नाही व गुणवत्ता यादीत स्थान असणार नाही.

४. परीक्षेसंबंधी सूचना

१. विद्यापीठाने ठरविलेल्या परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांला परीक्षा देणे बंधनकारक राहील.
२. परीक्षेचे वेळापत्रक परीक्षागृहात प्रवेश मिळविण्यासाठी प्रवेशपत्र विद्यार्थ्यांना अभ्यासकेंद्र/ विद्यार्थी सहायता केंद्रांवर उपलब्ध होईल. आपल्या प्रवेश-अर्जात पत्रव्यवहारासाठी दिलेल्या पत्त्यात काही बदल झाला तर तो वेळीच विभागीय केंद्रावर कळवावा .
३. चालू शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी डिसेंबर/जानेवारी मध्ये होणाऱ्या परीक्षेसाठी परीक्षा अर्ज भरण्याची गरज नाही.
४. विद्यार्थ्यानी गृहपाठ, प्रकल्प, प्रात्यक्षिकसंबंधी, लेखी परीक्षा, प्रात्यक्षिक परीक्षा यांचे वेळापत्रक, सूचनापत्र, परीक्षा केंद्र, प्रवेशपत्र, परीक्षा अर्ज, परीक्षेचा निकाल, इत्यादी माहितीसाठी आपल्या विद्यार्थी सहायता केंद्रांशी सतत संपर्कात राहावे, तसेच विद्यार्थ्यानी पत्रव्यवहार करण्यापूर्वी प्रथम माहितीपुस्तिकेतील नियम, सूचना वाचाव्यात. त्यानंतर विद्यार्थी सहायता केंद्रामार्फत पत्रव्यवहार करावा.
५. एकदा विद्यार्थ्याने प्रवेश घेतल्यानंतर त्यास परीक्षा न देता आल्यास त्याला पुढील पुनर्परीक्षेसाठी पुन्हा परीक्षा-अर्ज शुल्कासह भरावा लागेल. त्यासाठी त्याने आपल्या अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहायता केंद्राशी संपर्क साधावा.
६. परीक्षेच्या वेळी मोबाईल सोबत बाळगू नये.

इतर सूचना

१. कुठलाही पत्रव्यवहार करावयाचा असल्यास आपले पूर्ण नाव, पत्ता, अभ्यासकेंद्र/ विद्यार्थी सहायता केंद्राचे नाव, शिक्षणक्रमाचे नाव व कायम नोंदणी क्रमांक स्पष्ट व अचूक लिहावे.
२. http:/ycmou.digitaluniversity.ac या विद्यापीठाच्या वेबसाईटच्या पोर्टलवर उपलब्ध असलेल्या eSuvidha चा उपयोग विद्यार्थी, कायम नोंदणी क्रमांक (PRN) प्राप्त झाल्यानंतर वेळोवेळी करू शकतो.

०५. नोंदणी प्रक्रिया

१. विद्यापीठाच्या धोरणात्मक निर्णयानुसार प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने होईल. प्रथमतः आपण https://ycmou.digitaluniversity.ac विद्यापीठ संकेतस्थळाला भेट द्यावी.
२. विद्यापीठाच्या https://ycmou.digitaluniversity.ac या संकेतस्थळावरील Admission या टॅबवर जाऊन शैक्षणिक सत्र जून २०२५ माहितीपुस्तिका (Prospectus) या लिंकवर क्लिक करावे. विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांच्या माहितीपुस्तिका येथे उपलब्ध आहेत. आपल्याला प्रवेश घ्यायचा असलेल्या शिक्षणक्रमाची माहितीपुस्तिका डाउनलोड करून घ्यावी. शिक्षणक्रमाच्या प्रवेशासंबंधी (उदा. प्रवेशपात्रता, शुल्क, विषय-अभ्यासक्रम इत्यादी) माहिती वाचून आवश्यकअसलेल्या पृष्ठांची प्रिंट काढून घ्यावी.
३. विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून ऑनलाईन प्रवेश करताना शिक्षणक्रमनिहाय अभ्यासकेंद्रांची यादी उपलब्ध होईल. सदर यादीतून आपल्याला प्रवेश घ्यायचा असलेले अभ्यासकेंद्र निवडावे तसेच त्या अभ्यासकेंद्राचा संपूर्ण पत्ता व अभ्यासकेंद्र संकेतांक नोंदवून ठेवावा.
४. माहितीपुस्तिकेत नमूद केल्याप्रमाणे प्रवेश पात्रतेसाठी आवश्यक कागदपत्रे, फोटो आणि स्वाक्षरी JPG/JPEG/PNG या Format मध्ये स्कॅन करून घ्यावी. प्रत्येक फाईलची साईज 10 MB पेक्षा कमी असावी.
५. ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यापूर्वी विद्यापीठ संकेतस्थळावरील Presentations>User Guide Presentation >Students या तक्त्यातील Online Admission मध्ये दिलेली माहिती पहावी.
६. नव्याने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेश घेण्यापूर्वी विद्यापीठाच्या Online Admission या लिंकवर जाऊन स्वतःचा सक्रीय ई-मेल आणि मोबाइल क्रमांक नोंदवून USER ID आणि पासवर्ड तयार करणे आवश्यकआहे.

आपला USER ID आणि One Time Password (OTP) येथे नोंदवलेल्या मोबाईल क्रमांक आणि ई-मेलवर मिळेल. त्याच्या सहाय्याने नवीन पासवर्ड तयार करा व पुन्हा लॉगीन करून प्रवेश अर्ज भरा.

७. विद्यापीठाच्या यापूर्वीच्या विद्यार्थ्यांनी लॉगीन करण्यासाठी आपला कायम नोंदणी क्रमांक (PRN) आणि मागील वर्षी वापरलेला Password वापरावा. Password आठवत नसल्यास 'Forgot Password' लिंकचा वापर करून त्यात विचारलेली माहिती भरून पुढील ऑनलाईन प्रवेशप्रक्रिया पूर्ण करावी.

८. ऑनलाईन प्रवेश करताना विचारलेली सर्व माहिती काळजीपूर्वक भरावी. प्रवेश पात्रतेसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे, फोटो, स्वाक्षरी इत्यादी स्कॅन करून अपलोड करावीत. अर्धवट, अपूर्ण, चूकीची, अथवा अस्पष्ट (blur) असलेली कागदपत्रे अपलोड करू नयेत.

९. आपण प्रवेश घेत असलेल्या शिक्षणक्रमाचे प्रवेश शुल्क माहितीपुस्तिकेत नमूद केल्याप्रमाणे भरणे अनिवार्य आहे. ऑनलाईन प्रवेश अर्जात दिलेल्या लिंकवरून ऑनलाइन पेमेंट गेटवे वापरून क्रेडिट कार्ड /डेबिटकार्ड/नेटबँकिंग / युपीआयद्वारे प्रवेश शुल्क भरावे. प्रवेश अर्जात दिलेल्या लिंक व्यतिरिक्त इतर कुठल्याही लिंकवर शुल्क भरले जाणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची राहील.

१०.प्रवेश निश्चित झाल्याबाबतची माहिती देणारे तसेच इतर माहिती देणारे ई-मेल/एसएमएस मेसेजेस आपल्या ई-मेल आयडी आणि मोबाईलवर पाठविण्यात येतात. आपल्याला आलेले मेसेजेस जतन करून ठेवावेत.

११. आपण UserID आणि Password वापरून आपल्या प्रवेशाची सद्यस्थिती (Status) पाहू शकता. आपला अर्ज मान्य झालेला असल्यास Approved असा आणि अमान्य झालेला असल्यास Reject असा शेरा आपल्या प्रोफाईलमध्ये दिसेल. आपल्या अर्जाबाबतची स्थिती वेळोवेळी तपासावी.

१२. आपला प्रवेश रद्द झाल्याबाबतचा किंवा कागदपत्रे अपूर्ण असल्याबाबत कोणताही ई-मेल / मेसेज विद्यापीठाकडून पाठवला जात नाही. चूकीचा प्रवेश झाल्यास अथवा प्रवेशास अपात्र ठरल्यास विद्यापीठ नियमानुसार शुल्क परतावा मिळणार नाही.

१३. शिक्षणक्रम यशस्वीरित्या पूर्ण होईपर्यंत अर्जदारास ऑनलाईन प्रवेश अर्जातील माहिती बदलता येणार नाही.

१४. आपला प्रवेश कायम होण्यासाठी ऑनलाईन प्रवेश अर्जाची प्रिंट आणि पात्रतेसंबंधीची कागदपत्रे अभ्यासकेंद्रावर जमा करावीत. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध अध्ययन साहित्याचा वापर करावा.

१५. राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती बाबतचे सूचनापत्र संकेतस्थळावर दिलेले आहे. त्याचे काळजीपूर्वक वाचन करून ऑनलाईन प्रवेशाची आणि ऑनलाईन अर्जाची महाडीबीटी संकेतस्थळावर वेळेत कार्यवाही पूर्ण करावी.

१६. विद्यार्थ्यांचे ऑनलाईन ओळखपत्र अभ्यासकेंद्र / विद्यार्थी डाउनलोड करून प्रिंट करू शकतात.

१७. चालू शैक्षणिक वर्षाच्या माहितीपुस्तिकेतील प्रवेशासंबंधीचे सर्व नियम, अटी व शर्ती आणि हमीपत्राद्वारे दिलेल्या माहितीचे तसेच विद्यापीठाने वेळोवेळी केलेल्या सूचना व नियमांचे पालन करणे अर्जदारास बंधनकारक असेल.

१८. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनानुसार विद्यार्थ्याने कोणत्याही कारणास्तव प्रवेश रद्द केल्यास शिक्षणक्रम शुल्कातून लागू असलेल्या प्रक्रिया शुल्काची कपात करण्यात येईल.

१९.विद्यार्थी वैयक्तिक विमा योजना विद्यापीठाने लागू केली आहे. विद्यार्थ्याने यासंबंधी दावा (claim) करण्यासाठी विभागीय केंद्रामार्फत विद्यार्थी कल्याण व बहि:शाल केंद्राकडे लेखी पत्राद्वारे कळवावे. यासंदर्भात वेळोवेळी होणारे बदल लागू असतील.

०६. शिष्यवृत्ती योजना लागू असलेले विद्यापीठाचे शिक्षणक्रम

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST), इतर मागासवर्ग (OBC), विमुक्त जाती/ भटक्या जमाती (VJ / NT), विशेष मागास प्रवर्ग (SBC) व आर्थिक दुर्बल घटक (EWS) प्रवर्गातील/ घटकांतील विद्यार्थ्यांना शासनाच्या (Post Matric Scholarship Schemes) शिष्यवृत्ती योजना लागू आहेत.विद्यापीठ संकेतस्थळावर शिष्यवृत्तीबाबतचे सूचनापत्र दिलेले आहे. विद्यार्थ्यांनी प्रवेशअर्ज भरताना सदर सुचनापत्राचे काळजीपूर्वक वाचन करून योग्य त्या शिष्यवृत्ती पर्यायाची निवड करावी. असा पर्याय निवडून विद्यापीठाच्या खालीलपैकी शिक्षणक्रमाला ऑनलाईन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी महाडीबीटीच्या संकेतस्थळावरून शिष्यवृत्ती संबंधीच्या ऑनलाईन अर्जाची कार्यवाही विहित मुदतीत पूर्ण करणे अनिवार्य आहे. शिष्यवृत्ती योजना लागू असलेल्या शिक्षणक्रमांची यादी पुढीलप्रमाणे.

अ.क्र.	शिष्यवृत्ती योजना लागू असलेले विद्यापीठातील शिक्षणक्रम	शिक्षणक्रम कालावधी
१.	बी. ए. मराठी आणि उर्दू माध्यम	३ वर्षे
२.	बी. ए. जनसंज्ञापन आणिवृत्तपत्रविद्या	३ वर्षे
३.	एम. ए. मराठी	२ वर्षे
४.	एम. ए. हिंदी	२ वर्षे
५.	एम. ए. उर्दू	२ वर्षे
६.	एम. ए. इतिहास	२ वर्षे
७.	एम. ए. अर्थशास्त्र	२ वर्षे
८.	एम. ए. लोकप्रशासन	२ वर्षे
९.	ग्रंथालय व माहितीशास्त्र पदवी शिक्षणक्रम	१ वर्षे
१०.	ग्रंथालय व माहितीशास्त्र निष्णात शिक्षणक्रम	१ वर्षे

०७. ABC-ID/ APAAR-ID आणि DEB-ID तयार करण्याविषयीची सूचना

विद्यार्थ्यांस शिक्षणक्रम प्रवेशाच्यावेळीAcademic Bank of Credits (ABC-ID)/ Automated Permanent Academic Account Registry (APAAR) - ID तयार करणे अनिवार्य आहे. ABC-ID हाच आता APAAR-ID असून आपण यापूर्वी प्राप्त केलेल्या प्रमाणपत्र, पदविका, पदवीची माहिती DigiLocker (ABC-NAD) वर भरावी लागणार आहे. त्याशिवाय इतर अभ्यासक्रमांचे श्रेयांकांतर (क्रेडीट ट्रान्सफर) करता येणार नाही. ABC-ID/ APAAR-ID तयार करण्याकरिता https://www.abc.gov.in किंवा https://apaar.education.gov.in/ या पोर्टलवर नोंदणी करावी अथवा विद्यापीठाच्या www.ycmou.ac.in संकेतस्थळाला भेट द्यावी. विद्यापीठ संकेतस्थळावरील Student Zone या लिंकवर क्लिक करावे. यादीतील AcademicBank of Credits यावर क्लिक करून ABC-ID/ APAAR-ID तयार करण्यासंबंधीचे सादरीकरण पाहावे आणि त्यानुसार कार्यवाही करावी. मुक्त शिक्षणप्रणालीतील विद्यार्थ्यांना APAAR-ID सोबतच DEB-ID तयार करणे आवश्यकआहे. https://deb.ugc.ac.in/StudentDEBId या लिंकवरून DEB-ID तयार करता येईल.

०८. विशेष सूचना / संपर्कासाठी

अ) प्रवेश-अर्ज भरण्यासंबंधीच्या सूचना

१. प्रवेश-अर्ज भरण्यापूर्वी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्धअसलेली शिक्षणक्रमाची माहितीपुस्तिका वाचावी.
२. विद्यार्थ्याने प्रवेश घेण्यापूर्वी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर नोंदणी करून आपली प्रोफाईल तयार करणे आवश्यक आहे. यासाठी स्वतःचा मोबाईल क्रमांक (शक्यतो व्हॉट्सॲप) आणि सक्रीय असलेला इमेल आयडी नोंदवावा.
३. प्रवेश अर्ज आपण स्वतः भरणे, फोटो आणि स्वाक्षरी स्वतः अपलोड करणे किंवा समक्ष करून घेणे आवश्यक आहे. याबाबत माहितीपुस्तिकेत तसेच विद्यापीठ संकेतस्थळावर दिलेली माहिती वाचावी. (१.वेबसाईट—Presentations २.Registration Page Link)
४. ऑनलाईन प्रवेश-अर्ज भरताना शाळा सोडल्याच्या दाखल्याची प्रत (Leaving Certificate) तसेच शेवटच्या शैक्षणिक पात्रतेबाबत गुणपत्रकांच्या प्रती (Marksheets) अपलोड करणे आवश्यकआहे.
५. प्रवेश अर्जातील माहिती काळजीपूर्वक भरावी. एकदा Submit केलेल्या अर्जात नंतर बदल करता येणार नाही.

आ) विद्यार्थी सहायता केंद्रासंबंधीच्या सूचना

१. प्रवेशाची मुदत संपल्यानंतर संपर्कसत्रे केव्हा सुरू करण्यात येतील, त्यासंबंधी अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहायता केंद्रावर जाऊन वेळापत्रक पाहावे. ओळखपत्रावर अभ्यासकेंद्र प्रमुखांची स्वाक्षरी व शिक्का घ्यावा. अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहायता केंद्रात येताना व परीक्षेच्यावेळी ओळखपत्र सोबत असणे आवश्यकआहे.
२. विद्यापीठाने स्थापन केलेल्या अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहायता केंद्राव्यतिरिक्त अन्य कोणत्याही खाजगी संस्था किंवा शिकवणी वर्गांना (क्लास) विद्यापीठाची मान्यता नाही, अशा संस्थेत किंवा 'क्लास' मध्ये प्रवेश घेतल्यास किंवा जादा शुल्क भरल्यास त्यासाठी विद्यापीठ जबाबदार असणार नाही.
३. विद्यापीठाने निर्धारित केलेल्या अभ्यासकेंद्र / सहायता केंद्रावर अंतिम परीक्षा घेण्यात येते, त्यात बदल होणार नाही.
४. अंतर्गत मूल्यमापनासाठी गृहपाठाचे प्रश्न विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले जातात. सदर गृहपाठ पूर्ण करून विद्यार्थी सहायता केंद्रावर विहित वेळेत जमा करावे. याबाबत अधिक माहितीसाठी संबंधित अभ्यासक्रमाच्या समंत्रक-प्राध्यापकांकडून मार्गदर्शन घ्यावे.
५. अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहायता केंद्रावर पुरेशी विद्यार्थी नोंदणी झालेली नसल्यास अशा केंद्रावरील विद्यार्थ्यांना जवळच्या केंद्रावर संपर्कसत्र व परीक्षेस वर्ग (Transfer) करण्यात येईल.
६. **अत्यंत महत्त्वाचे:** प्रथम वर्षाला ज्या नावाने प्रवेश घेतलेला आहे, त्याच नावाने पदवी प्रमाणपत्र मिळेल. त्यात बदल होणार नाही याची नोंद घ्यावी. नावात बदलअसल्यास राजपत्राची प्रत अनिवार्यआहे.
७. विद्यापीठाकडून मिळालेले गुणपत्रक तसेच पदवी प्रमाणपत्र गहाळ झाल्यास विद्यापीठ नियमानुसार निर्धारित शुल्क रुपये ६००/- (रुपये सहाशे) भरून दुय्यम प्रतीची मागणी करता येईल. तसेच त्याकरिता रु. १०० च्या बॉण्डपेपरवर स्वयंघोषित प्रतिज्ञापत्र (Affidavit) सादर करणेआवश्यकअसेल.
८. विद्यार्थ्यांनी प्रवेश, गृहपाठ, परीक्षा, पुनर्परीक्षा इत्यादीबाबत सविस्तर माहिती मिळवण्यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळाला वेळोवेळी भेट द्यावी. अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहायता केंद्राशी सतत संपर्क ठेवणे आपल्या हिताचेआहे.

इ) विद्यापीठाचे मुख्यालय

'ज्ञानगंगोत्री परिसर', गोवर्धन, गंगापूर धरणाजवळ, नाशिक — ४२२२२२
दूरध्वनी क्र. (०२५३) २२३१७१४, २२३१७१५, २२३०२२७

- **विद्यापीठ व विभागीय केंद्र यांच्या कार्यालयीन वेळा पुढीलप्रमाणेआहेत.**
  - सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.४५ (दुपारी १.३० ते २.०० सुट्टी)
  - रविवार, प्रत्येक महिन्याचा पहिला व तिसरा शनिवार तसेच शासकीय सुट्टीच्या दिवशी वरील कार्यालये बंद राहतील.

- **विशेष अडचणींबाबत संपर्क**

१. **माहितीपुस्तिका, प्रवेश अर्ज, अभ्यासकेंद्र/ विद्यार्थी सहायता केंद्र अडचणी**
   - ❖ संचालक, विद्यार्थी सेवा विभाग, नाशिक
   - ❖ प्रमुख, नोंदणी कक्ष, नाशिक
   - ❖ विभागीय संचालक, संबंधित विभागीय केंद्र

२. **अभ्यासक्रम (विषय) यांतील अडचणी**
   - ○ संचालक, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा

   दूरध्वनी (०२५३) २२३१४७५ ई-मेल: dir_shu@ycmou.digitaluniversity.ac

३. **नोंदणी, नोंदणी क्रमांक, पत्ताबदल, अभ्यासकेंद्र बदल**
   - ○ प्रमुख, नोंदणी कक्ष, नाशिक

   दूरध्वनी (०२५३) २२३०५८० ई-मेल: nondani@ycmou.digitaluniversity.ac

४. **परीक्षा, परीक्षा अर्ज, आसन क्रमांक, निकाल, पदवी प्रमाणपत्र इत्यादी.**
   - ○ परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग

   दूरध्वनी (०२५३) २२३०७१६ ई-मेल: coe@ycmou.digitaluniversity.ac

५. **अध्ययन-साहित्य, पुस्तके इत्यादी.**
   - ○ भांडार व्यवस्थापक, भांडार व जावक कक्ष ई-मेल : ycmoustore@gmail.com

   दूरध्वनी (०२५३) २२३०१०७

६. **शिष्यवृत्ती**
   - ○ शिष्यवृत्ती कक्ष, य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

   दूरध्वनी (०२५३) २२३००५० ई-मेल : scholarship@ycmou.digitaluniversity.ac

७. **संबंधित विभागीय केंद्र**

०९. सायबर सुरक्षा अभ्यासक्रम (अनिवार्य ऑडीट कोर्स)

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने पदवी आणि पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमांना प्रवेशित विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा अभ्यासक्रम लागू केला असून या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२४- २५ पासून केली जात आहे. सदर ऑनलाईन अभ्यासक्रम श्रेयांकशून्य (non-credit) ऑडीट कोर्स असून विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेला शिक्षणक्रम पूर्ण करण्यापूर्वी पूर्ण करणे अनिवार्य असेल.सायबर सुरक्षा अभ्यासक्रम उत्तीर्ण झाल्यानंतरच विद्यार्थ्यांना त्यांच्या मूळ शिक्षणक्रमाचे प्रमाणपत्र मिळेल. ग्रंथालय व माहितीशास्त्र पदवी शिक्षणक्रमात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षा हा अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर त्यांना हा अभ्यासक्रम ग्रंथालय व माहितीशास्त्र निष्णात शिक्षणक्रमात पुन्हा करावयाची आवश्यकता नाही.

याबाबतची सविस्तर माहिती सोबतच्या परिशिष्ट ९ मध्ये देण्यात आली आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क:

- ❖ मा. संचालक, संगणकशास्त्र विद्याशाखा, य.च.म.मुक्तविद्यापीठ, नाशिक
  दूरध्वनी (०२५३) २२३०७१७ ई-मेल:scmcs@ycmou.digitaluniversity.ac
- ❖ मा. संचालक, ऑनलाईन शिक्षण विद्याशाखा, य.च.म.मुक्तविद्यापीठ, नाशिक
  दूरध्वनी (०२५३) २२३०१९१ ई-मेल:dir_sol@ycmou.ac.in

महत्वाची सूचना :

- विद्यापीठाकडून अभ्यासकेंद्र/ विद्यार्थी सहायता केंद्रावर छापील पुस्तके प्राप्त होईपर्यंत विद्यार्थ्यांनी *http://ycmou.digitaluniversity.ac* आणि www.ycmou.ac.in संकेतस्थळावर .pdf स्वरूपात उपलब्ध असलेली पुस्तके अभ्यासावीत.
- एकापेक्षा अधिक शिक्षणक्रमांना प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या वेळापत्रकानुसार एकाच दिवशी एकाच वेळी दोन शिक्षणक्रमांच्या परीक्षा येत असतील तर, आपल्या पसंतीनुसार कोणतीही एक परीक्षा द्यावी. पुढील पुरवणी परीक्षेदरम्यान नियमानुसार परीक्षा अर्ज भरून राहिलेल्या अभ्यासक्रमाची परीक्षा द्यावी. पदवी आणि पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमातील कोणत्याही अभ्यासक्रमाची परीक्षा देता आली नसली तरी संबंधित शिक्षणक्रमाच्या पुढील वर्षास प्रवेश घेता येईल.
- ''प्रकल्प'' निर्धारित वेळेत अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहायता केंद्रावर प्रत्यक्ष सादर करायचे आहेत. विद्यापीठ संकेतस्थळावर अपलोड करायचे नाहीत.
- अभ्यासक्रमात अनुत्तीर्ण झाल्यास किंवा संबंधित वर्षात संशोधन प्रकल्प सादर न केल्यास चालू शैक्षणिक वर्षातील विषयसूचीनुसार प्रकल्पाचे पुनर्सादरीकरण करावे.
- एखाद्या शिक्षणक्रमास महाराष्ट्रभरातून २० पेक्षा कमी विद्यार्थ्यांचे प्रवेश झाल्यास असा शिक्षणक्रम चालू शैक्षणिक वर्षामध्ये स्थगित ठेवण्याचा अधिकार विद्यापीठाला राहील. अशावेळी संबंधित शिक्षणक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांचे पूर्ण शुल्क परत करण्यात येईल.
- In case of less than 20 admissions to any Program (from entire State of Maharashtra), the university will have right to put the program on hold in the current academic year. In such case, total fees paid by the learner towards the Program fees will be refunded.

१०. विभागीय केंद्रे

१. **अमरावती :** य. च. म. मुक्त विद्यापीठाचे अमरावती विभागीय केंद्र, वलगाव रोड, पोस्ट व्ही. एम. व्ही. अमरावती – ४४४ ६०४ दूरध्वनी क्र. (०७२१) २५३१४४५, ९५९५१९७०९९ ई-मेल: rd_amravati@ycmou.digitaluniversity.ac

२. **छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) :** य. च. म. मुक्त विद्यापीठाचे संभाजीनगर विभागीय केंद्र, सर्व्हे नं. ४१, सैनिकी मुलांच्या वसतिगृहाच्या पूर्वेस, नंदनवन कॉलनी, छावणी, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) - ४३१००२ दूरध्वनी क्र. (०२४०) २३७१०७७, २३७१०६६, ९९२२९४२१७७ ई-मेल: rd_aurangabad@ycmou.digitaluniversity.ac

३. **कोल्हापूर :** य. च. म. मुक्त विद्यापीठाचे कोल्हापूर विभागीय केंद्र, शिवाजी विद्यापीठ परिसर, पोस्ट ऑफिसजवळ, विद्यानगर, कोल्हापूर - ४१६ ००४ दूरध्वनी क्र. (०२३१) २६०७०२२, २६०७०२३, ९४२३९७९६४५, ९४२३९७९७५०, ९४०४९६१४९६ ई-मेल: rd_kolhapur@ycmou.digitaluniversity.ac

४. **मुंबई :** य. च. म. मुक्त विद्यापीठाचे मुंबई विभागीय केंद्र, द्वारा: जगन्नाथ शंकरशेठ म. न. पा. ची मराठी शाळा, दुसरा मजला, फ्रेअर ब्रीज (साऊथ), नाना चौक, ग्रँट रोड (प.) मुंबई - ४०० ००७ दूरध्वनी क्र. (०२२) २३८७४१८०, २३८७४१८७, २३८७४१८३, ९९२२३७९३१९, ९८६९१९५६९५ ई-मेल: rd_mumbai@ycmou.digitaluniversity.ac

५. **नागपूर :** य. च. म. मुक्त विद्यापीठाचे नागपूर विभागीय केंद्र रावबहादूर डी., लक्ष्मीनारायण बंगला, विद्यापीठ क्रीडा परिसर, लॉ कॉलेज कॅम्पस, रवीनगर चौक, नागपूर - ४४० ००१ दूरध्वनी क्र. (०७१२) २५५३७२४, (०७१२) २५५३७२५, ९४०३७७४६०७, ९४०३७७४६२७ ई-मेल: rd_nagpur@ycmou.digitaluniversity.ac

६. **नाशिक :** य. च. म. मुक्त विद्यापीठाचे नाशिक विभागीय केंद्र, नाशिक महानगरपालिकेची जुनी इमारत, दुसरा मजला, नवीन पंडित कॉलनी नाशिक - ४२२००२ दूरध्वनी क्र. (०२५३) २३१७०६३, ९४०३७७४७०६ ई-मेल: rd_nashik@ycmou.digitaluniversity.ac

७. **नांदेड :** य. च. म. मुक्त विद्यापीठाचे नांदेड विभागीय केंद्र, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाजवळ, नांदेड – ०६ दूरध्वनी क्र. ९६८९१७४८७८, ९४२२२४७२९६ ई-मेल: rd_nanded@ycmou.digitaluniversity.ac

८. **पुणे :** य. च. म. मुक्त विद्यापीठाचे पुणे विभागीय केंद्र, शाहीर अण्णाभाऊ साठे प्रशालागृह, महापालिका शाळा क्र. ५ (मुलांची), ६५४, सदाशिव पेठ हौदासमोर, कुमठेकर मार्ग, पुणे - ४११ ०३० दूरध्वनी क्र. (०२०) २४४५७९१४, २४४९११०७, ८३२९२५६७३६ ई-मेल: rd_pune@ycmou.digitaluniversity.ac

११. परिशिष्टे

परिशिष्ट ०१ : उमेदवार / विद्यार्थी करारनामा

हा करार विद्यार्थी किंवा उमेदवार आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (यचममुवि) यांच्यामध्ये, विद्यार्थी / उमेदवार याने 'Accept'ह्या बटनावर क्लिक केल्यामुळे आपोआप अस्तित्वात आलेला आणि दोन्ही पक्षांना मान्य, कबूल आणि वैध असलेला मानण्यात येईल.

या करारनाम्यात 'उमेदवार' या संज्ञेचा वापर अशा व्यक्तींसाठी करण्यात आला आहे की जो यचममुविमार्फत राबविण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमात प्रवेश घेऊ इच्छितो आणि 'विद्यार्थी' या संज्ञेचा वापर अशा व्यक्तींसाठी करण्यात आलेला आहे, ज्या व्यक्तीने यचममुविमार्फत राबविण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमास विहित पद्धतीचा अवलंब करून प्रवेश घेतला आहे.

उमेदवार असे मान्य व कबूल करितो की,

१. त्याने माहितीपुस्तिका तसेच संगणक पडद्यावर उपलब्ध असलेल्या मजकुराचा, माहितीचा, सूचनांचा व्यवस्थित पद्धतीने अभ्यास केला आहे आणि त्यानुसार योग्य त्या कृती केल्या आहेत.

२. त्याने ही खात्री करून घेतलेली आहे की, त्याने निवडलेल्या शिक्षणक्रमास तो पात्र आहे आणि जर तो माहितीपुस्तिका आणि / किंवा संगणक पडद्यावर उपलब्ध माहितीप्रमाणे अपात्र ठरत असेल तर त्याचा प्रवेश ताबडतोब रद्द करण्यात येईल आणि त्याने विद्यापीठात भरलेले शुल्क त्यास आंशिक किंवा पूर्ण स्वरूपात परत मिळणार नाही.

३. त्याने त्यास अध्ययन साहित्य (पुस्तके) कोणत्या स्वरूपात (छापील पुस्तके, इ-बुक, मोबाईल ॲप, दृकश्राव्य फिती, ध्वनिफिती सीडीवर किंवा इंटरनेटवर उपलब्ध असलेला मजकूर) उपलब्ध होणार आहे याची माहिती माहितीपुस्तिकेच्या संबंधित भागातून मिळविली आहे. आणि सदर स्वरूपात अध्ययन साहित्य उपलब्ध होणार आहे याबाबत त्याचे कोणतेही आक्षेप नाहीत आणि तो यापुढे कधीही अध्ययन साहित्य माहितीपुस्तिकेत दिलेल्या स्वरूपापेक्षा वेगळ्या स्वरूपात मिळण्याची मागणी करणार नाही.

४. तो यचममुवि संदर्भातील कोणतीही तक्रार किंवा इतर कोणतेही निवेदन त्यास सादर करावयाचे असल्यास अशी तक्रार किंवा निवेदन तो यचममुवि मार्फत उपलब्ध असलेल्या संगणकीय प्रणालीचा (युजर आयडीचा) वापर करून करेल. अशी तक्रार किंवा निवेदन तो तक्रार किंवा निवेदनाचे उद्भवणाऱ्या कारणांच्या दिनांकाच्या तीस दिवसांच्या आत संगणकीय प्रणालीचा वापर करूनच करेल.

५. त्यास हे मान्य व कबूल आहे की, विद्यापीठाला शिक्षणक्रम राबविण्याच्या नियमांमध्ये, धोरणांमध्ये, अध्ययन साहित्यामध्ये, पाठ्यक्रमात बदल करण्याचा अधिकार आहे आणि अशा नियमांमधील, धोरणांमधील, अध्ययन साहित्यामधील, पाठ्यक्रमामधील बदल त्यास बंधनकारक असतील आणि याबाबत त्याची कोणतीही तक्रार असणार नाही.

६. तो शिक्षणक्रमाच्या कालावधीमध्ये विद्यापीठात नोंदविलेल्या त्याच्या भ्रणध्वनी क्रमांकात बदल करणार नाही.

७. त्यास हे मान्य व कबूल आहे की, त्याने नोंदणीच्या वेळेस विद्यापीठात सादर केलेल्या माहितीत बदल करणे (फोटोग्राफ, भ्रमणध्वनी क्रमांक, जन्मतारीख, पत्ता, इत्यादीसाठी) योग्य ते शुल्क आकारण्याचे अधिकार विद्यापीठाने राखून ठेवले आहेत.

८. त्यास हे मान्य व कबूल आहे की, जर विद्यापीठास शासनाकडून (शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांसंदर्भात) त्याचे शुल्क प्राप्त झाले नाही तर अशा विद्यार्थ्यांना परीक्षा देण्यास मज्जाव करण्यात येईल आणि जर परीक्षा दिलेली असेल तर त्याचा निकाल तेव्हापर्यंत राखून ठेवण्यात येईल जेव्हापर्यंत त्याचे शुल्क विद्यापीठास प्राप्त होत नाही.

९. त्यास याचीही कल्पना आहे की, त्याच्याकडून कोणतीही असत्य, अपुरी माहिती दिली गेल्यास त्याचा प्रवेश रद्द करण्यात येईल आणि जर त्यास पदवी किंवा पदविका निर्गमित करण्यात आलेल्या असतील तर अशा प्रकारे असत्य, अपूर्ण माहिती मिळाल्याचे सिद्ध झाल्यानंतर त्याची पदवी, पदविका रद्दबातल करण्यात येईल.

१०. तो विद्यापीठाचे संकेतस्थळ (https://ycmou.digitaluniversity.ac/ and https://ycmou.ac.in/) येथे नियमितपणे भेट देईल आणि तेथे देण्यात आलेल्या शैक्षणिक किंवा प्रशासकीय स्वरूपाच्या सूचनांचे (उदाहरणार्थ, परीक्षा हॉलतिकीट डाऊनलोड करणे आणि त्याची छपाई करणे) काटेकोरपणे पालन करेल.

११. शिक्षणक्रमाचा अभ्यास परिश्रमपूर्वक, शिस्तबद्ध आणि प्रामाणिकपणे करेल.तसेच आपले वर्तन विद्यापीठाच्या आदर्श विद्यार्थ्याप्रमाणे करेल वअशी कोणतीही कृती करणार नाही की जी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यास शोभणार नाही.

परिशिष्ट ०१ : Candidate/Student Agreement at the time of Admission

This is an agreement between the student or candidate and the YCMOU which is entered into by virtue of the candidate for admission clicking on '**ACCEPT**' button on the online admission portal at the time of admission to a program using online admission process. '

In this agreement the term "candidate" is used to mean the person who proposes to take admission to a program in YCMOU and the term "student" is used to mean a person who has been admitted to a program of the YCMOU after fulfilling all the conditions thereof.

The candidate undertakes that –

1. He has gone through the prospectus and the onscreen narrations or directions and has sincerely responded to the on-screen directions.
2. He has ensured that he is eligible to the program to which he proposes to take admission and that if it is found otherwise, (that is, if he is found not to be fulfilling the conditions of the eligibility at any time as per the rules mentioned in the prospectus or the on-line narrations) his admission will be summarily cancelled and the fees paid to the university will not be refunded in part or in full.
3. The information about the medium/mode of delivery of the Study Material (for example printed books, e-books, mobile app, audio/ video material available on internet or through CD/DVD, etc) has been duly studied by me in the relevant pages of the prospectus and I have no objection to the said mode of delivery. He shall not make any demands on the methods or medium of delivery other than that mentioned in the prospectus.
4. He shall make any representations to the YCMOU by logging on as a student in respect of any activities of grievances within a period of thirty days from the date of cause of the grievances or by an email to the university at the designated e-mail address.
5. He understands that the University reserves right to make changes in the rules or syllabi or learning material or any other policy matter as a matter of urgency and that such changes in the rules, syllabi or policy matters shall be binding and applicable on him and that he shall not make objections to such changes.
6. He shall not change his mobile number as registered with the University during the time of admission to the program.
7. He understands that the University shall levy charges on changes in profiles of the student, including the photograph, mobile number, date of birth, etc.
8. He understands that in case the University does not receive the fees from the Government (in case of Scholarship or Free-ship candidates), the student may be barred from taking examinations and his results shall not be declared till such time that the fees have been received.
9. He understands that any incorrect or incomplete information given by him is liable to cancellation of his admission or withdrawal of degree or diploma awarded to him as and when the university gets to know of such supply of incomplete or incorrect information.
10. He shall visit the University's website (ycmou.ac.in) regularly and undertake necessary steps for academic and administrative purposes as expected from him including downloading of the examination hall ticket and printing the same.
11. He shall undertake studies of the academic program with necessary industry, discipline, honesty and conduct himself with due dignity and shall do nothing which is unbecoming of a student of the YCMOU.

परिशिष्ट ०२ : गरीब विद्यार्थी सहाय्य योजना नियमावली

१. नाव : गरीब विद्यार्थी सहाय्य योजना

२. व्याप्ती

२.१ सदरची गरीब विद्यार्थी सहाय्य योजना यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या एकावर्षापेक्षा अधिक कालावधीच्या सर्व शिक्षणक्रमांच्या विद्यार्थ्यांना लागू राहील.

२.२ आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी सदर योजना लागू असेल.

३. पात्रतेचे निकष

३.१ गरीब विद्यार्थी सहाय्य योजनेचा लाभ मिळण्यासाठी कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नाची कमाल मर्यादा रु. १,००,०००/- राहील.

३.२ तहसिलदाराचे मूळ उत्पन्नाचे प्रमाणपत्र मागील वित्तीय वर्षाचे असावे.

३.३ सदर योजनेचा लाभ देताना संबंधित विद्यार्थी / विद्यार्थिनी मागील शैक्षणिक वर्षाच्या अंतिम परीक्षेत उत्तीर्ण असणे आवश्यक राहील.

३.४ गरीब विद्यार्थी सहाय्य योजनेसाठी विद्यार्थ्याने मागील वर्षी योजनेचा लाभ घेतला असेल तर सदर विद्यार्थी सर्व विषयांत उत्तीर्ण असणेआवश्यक आहे.

३.५ सदर योजनेसाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीने त्याला ज्या शैक्षणिक वर्षासाठी योजनेचा लाभ मंजूर करण्यात आला तो अभ्यासक्रम त्याने / तिने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त अभ्यासकेंद्रातून पूर्ण करणे आवश्यक आहे.अभ्यासक्रमाचे वर्ष पूर्ण होण्यापूर्वी संबंधित विद्यार्थ्याचा प्रवेश कोणत्याही कारणास्तव रद्द झाल्यास विद्यापीठाने प्रदान केलेली रक्कम व प्रमाणपत्र विद्यापीठास परत करण्याची जबाबदारी संबंधित विद्यार्थी, अभ्यासकेंद्र व विभागीय केंद्र यांची राहील.

३.६ राज्य शासन / केंद्र शासन यांच्याकडे शिष्यवृत्ती मिळण्यासाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देय नाही.

३.७ रु. ३,०००/- पेक्षा कमी फी असलेल्या शिक्षणक्रमाकरिता ही योजना लागू नाही.

४. योजनेची गुणांची निकष पद्धत

४.१ विद्यार्थी शहरी भागातील असल्यास	१ गुण
४.२ विद्यार्थी ग्रामीण भागातील असल्यास	२ गुण
४.३ विद्यार्थी अतिदुर्गम भागातील असल्यास	३ गुण
४.४ प्रकल्पग्रस्त असल्यास	२ गुण
४.५ खेळाडू असल्यास (विभागीय / राज्य पातळी)	४ गुण
४.६ उत्पन्न मर्यादा रु. ३५०००/- पर्यंत	३ गुण
४.७ उत्पन्न मर्यादा रु. ७००००/- पर्यंत	२ गुण
४.८ उत्पन्न मर्यादा रु. १,००,०००/- पर्यंत	१ गुण

५. अनुज्ञेय रक्कम

५.१ अनुज्ञेय रक्कम या योजनेसाठी निश्चित केलेल्या निकषांनुसार प्राप्त गुणांच्या आधारे व शिक्षणक्रम पातळीनिहाय ठरविलेल्या रकमेच्या आधारे निश्चित केली जाईल.

५.२ पदविका शिक्षणक्रम : रु. ३,०००/- किंवा शिक्षणक्रमाचे शुल्क यापैकी जे कमी असेल ती रक्कम

५.३ पदवी शिक्षणक्रम : रु. ५,०००/- किंवा शिक्षणक्रमाचे शुल्क यापैकी जे कमी असेल ती रक्कम

५.४ पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा शिक्षणक्रम : रु. ५,०००/- किंवा शिक्षणक्रमाचे शुल्क यापैकी जे कमी असेल ती रक्कम

५.५ पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम : रु. ७,०००/- किंवा शिक्षणक्रमाचे शुल्क यापैकी जे कमी असेल ती रक्कम

५.६ गरीब विद्यार्थी सहाय्य निधी योजनेकरिता अर्थसंकल्पातील अंदाजपत्रकीय तरतूद आरक्षण विभागातर्फे त्या-त्या शैक्षणिक वर्षात करण्यात येईल.

५.७ अनुज्ञेय रक्कम उदाहरण दाखल तक्ता :

अ.क्र.	**किमानगुण**	**अनुज्ञेय रकमेचे प्रमाण %**	**डिप्लोमा**	**पदवी / पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा**	**पोस्ट ग्रॅज्युएट डिग्री**
			रु. ३०००/-	रु. ५०००/-	रू. ७०००/-
१.	०२	३०	९००	१५००	२१००
२.	३ ते ५	५०	१५००	२५००	३५००
३.	६ च्या पुढे	१००	३०००	५०००	७०००

६. गरीब विद्यार्थी सहाय्य योजनेअंतर्गत मदत मिळण्यासाठी अर्ज सादर करण्याची पद्धत

६.१ गरीब विद्यार्थी सहाय्य निधी योजनेचा विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक सहपत्रे जोडूनअभ्यासकेंद्राकडे दिलेल्या मुदतीत सादरकरणे आवश्यक राहील.

६.२ विद्यार्थ्याने सादर केलेल्या विहित नमुन्यातील अर्जावर अभ्यासकेंद्र प्रमुख / संयोजक यांचा सही व शिक्का असणे बंधनकारक राहील.

६.३ अर्जातील प्रतिज्ञापत्रावर विद्यार्थ्यांची सही व राष्ट्रीयीकृत बँकेचा तपशील म्हणजे बँकेचे नाव, शाखा, खाते क्रमांक, आय एफ एस सी (IFSC) कोड या बाबी नोंदवणे आवश्यक आहे.

६.४ मागील वर्षी सदर योजनेचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी मागील वर्षीच्या गुणपत्रिकेची छायांकित प्रत जोडली आहे काय तसेच ते मागील वर्षाच्यापरीक्षेत उत्तीर्ण आहेत काहे अभ्यासकेंद्र प्रमुखांनी पहावे.

६.५ अभ्यासकेंद्रप्रमुखांनी विद्यार्थ्यांकडून अर्ज निर्धारित मुदतीत भरून घेऊन विभागीय केंद्रांकडे सादर करावेत.

६.६ अभ्यासकेंद्राने विभागीय केंद्राकडे सादर केलेल्या अर्जाची छाननी वरील निकषांच्या आधारे विभागीय केंद्राने करावी. तसेच विद्यापीठाने दिलेल्या विहित नमुन्यातील माहिती Excel Sheet मध्ये करावी व Hard Copy/Soft Copy तयार करावी.

६.७ प्रत्येक शैक्षणिक वर्षात अभ्यासकेंद्रांनी गरीब विद्यार्थी सहाय्य योजनेचे अर्ज जमा करावेत व विभागीय केंद्रांनी सदरचे अर्ज व तक्त्यातील माहिती सहायक कुलसचिव, नोंदणी कक्ष यांच्याकडे सादर करावी.

६.८ पात्र विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ मंजूर केल्याबाबतची अंतिम यादी जानेवारीमध्ये विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर केली जाईल.

परिशिष्ट ०३ : विद्यापीठ अनुदान आयोगाचे (युजीसीचे) मान्यतापत्र (२००४)

ज्ञान-विज्ञानं विमुक्तये

विश्वविद्यालय अनुदान आयोग
बहादुरशाह जाफर मार्ग
नई दिल्ली–११० ००२
UNIVERSITY GRANTS COMMISSION
BAHADURSHAH ZAFAR MARG
NEW DELHI-110002

F1-52/2000(CPP-II) 5 MAY 2004

The Registrar / Director
Of all the Indian Universities
(Deemed, State, Central Universities /
Institutions of National importance)

Subject : Recognition of Degrees awarded by Open Universities.

Sir/Madam,

There are a number of open Universities in the country offering various degrees/diploma through the mode of non-formal education. **The Open Universities have been established in the country by an Act of Parliament or State Legislature in accordance with the provisions contained in Section 2(f) of University Grants Commission Act, 1956. These universities are, therefore, empowered to award degrees in terms of Section 22(1) of the UGC Act, 1956.**

A circular was earlier issued vide UGC letter N.F.1-8/92(CPP) dated February, 1992 mentioning that the Certificate, Diplomas and Degrees awarded by Indira Gandhi National Open University are to be treated equivalent to the corresponding awards of the Universities in the country.

Attention is further invited to UGC circular No.F1-25/93(CPP-II) dated 28th July, 1993 (copy enclosed) for recognition of degrees and diplomas as well as transfer of credit for courses successfully completed by students between the two types of universities so that the mobility of students from Open University stream to traditional Universities is ensured without any difficulty.

